# दैनिक लोकविजय

संस्थापक : कै. पां. ग. रांजणीकर


## दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणी बीआरएस नेत्या कवितांना अटक

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- दिल्ली मद्य घोटाळा प्रकरणी ईडीने तेलंगणाचे माजी मुख्यमंत्री केसीआर यांच्या कन्या आणि आमदार के. कविता यांना ताब्यात घेण्यात आले आहे. एएनआयच्या सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, तपास यंत्रणा त्यांना चौकशीसाठी दिल्लीत आणू शकते. बीआरएस नेत्या कविता यांच्या हैदराबाद येथील घरावर अंमलबजावणी संचालनालयाने (ईडी) शुक्रवारी सकाळी छापा टाकला. कविता यांनी तपास यंत्रणेच्या अनेक समन्सकडे दुर्लक्ष केल्याने ही कारवाई करण्यात आली आहे. कविता या तेलंगणातील विधान परिषदेच्या सदस्य आहेत आणि भारत राष्ट्र समितीचे प्रमुख आणि माजी मुख्यमंत्री के चंद्रशेखर राव यांच्या कन्या आहेत. मार्च २०२३ मध्ये, ईडीने दिल्ली मद्य धोरण घोटाळा प्रकरणात के. कविता यांचे नाव देखील समाविष्ट केले होते. ईडीने तपासासंदर्भात काही कागदपत्रे न्यायालयात सादर केली होती. त्यात कवितांचेही नाव होते. 'आप'च्या नेत्यांना १०० कोटी रुपये दिल्याचा आरोप त्यांच्यावर आहे. या प्रकरणात नाव समोर आल्यानंतर कविता यांनी भाजपवर निशाणा साधला होता. त्या म्हणाल्या होत्या की, निवडणूक राज्यांमध्ये ईडी पंतप्रधान मोदींच्या आधी पोहोचते.


(वर्ष ६३ वे अंक ८१) पोस्टाचा परवाना नं. / अे / आर / ए.जी.डी. - ०७ / २०२३ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद), शनिवार, दि.१६ मार्च २०२४ (पाने ४) (किंमत २ रुपये)


# लोकसभा निवडणूकीची आज घोषणा

### आदर्श आचारसंहिताही लागणार; निवडणूक आयोगाच्या पत्रकार परिषदेकडे देशाचे लक्ष



नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- लोकसभा निवडणूक नेमकी कधी असणार याची उत्सुकता शिगेला पोहचलेली असतांनाच आज २०२४ च्या लोकसभा निवडणूकीची घोषणा केली जाणार आहे. निवडणूक आयोगाची आज दुपारी ३ वाजता पत्रकार परिषद होणार असून त्यामध्येही घोषणा होईल आणि लगेचच देशभरात आदर्श आचारसंहिता लागू होणार असल्याचे दाट संकेत आज मिळाले आहेत. याला पुष्टी देणारे एएनआयने वृत्त दिले असून निवडणूक आयोगाच्या या पत्रकार परिषदेकडे देशाचं लक्ष असणार आहे. निवडणूक आयोगाच्या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पत्रकार परिषद थेट प्रक्षेपित केले जाईल.

या घोषणेमुळे लोकसभा निवडणुकीचा राजकीय लढाईचा टप्पा निश्चित होईल. ज्यामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील एनडीए सरकार दुर्मिळ तिसरी टर्म जिंकण्याची आशा करत आहे, तर विरोधक इंडिया आघाडीच्या अंतर्गत एनडीएमध्ये धक्का देण्याची आशा करत आहेत. दरम्यान, आदर्श आचारसंहिता निवडणूक घोषणा झाल्यानंतर लगेचच लागू होते, ती सुद्धा उद्याच होणार आहे. यावेळी लोकसभेच्या निवडणुका ६ ते ७ टप्प्यात घेतल्या जातील असे मानले जात आहे.

निवडणूक आयोगाचे सीईसी राजीव कुमार, (पान ४ वर)

# निवडणूक रोखे देशातील सर्वात मोठे खंडणी रॅकेट-राहुल गांधी

### भारत जोडो न्याय यात्रा मुंबईत; भाजपसह सीबीआय, ईडीवर हल्लाबोल

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- निवडणूक रोखे देशातील सर्वात मोठे खंडणी रॅकेट आहे. सीबीआय आणि ईडी तपास करत नाहीत, ते भाजपची वसुली करतात, असा घणाघाती प्रहार काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी केला. भाजप निवडणूक रोख्यांच्या जोरावर पक्ष फोडतो ही राष्ट्रविरोधी कृती असून राष्ट्रवादी काँग्रेस पैशाने फोडल्याचा आरोप त्यांनी केला. देशात ज्या संस्था अस्तित्वात होत्या, त्या आता भाजप आणि आरएसएसचे हत्यार आहेत, त्यामुळेच हे सर्व घडत असल्याचे राहुल म्हणाले. या संस्थांनी त्यांचे काम केले असते तर हे सर्व घडले नसते. तसेच या सर्व संघटनांनी विचार करावा की एक दिवस भाजपचे सरकार जाईल, मग कठोर कारवाई केली जाईल.

राहुल गांधी म्हणाले की, निवडणूक रोखे म्हणजे कंपन्यांकडून हप्ता घेण्याचा प्रकार आहे. यामध्ये अनेक कंपन्या असून काही कंपन्यांचे नाव येणे बाकी आहे. सर्व संस्थांना भ्रष्टाचार करायला सांगत असून ही पंतप्रधानांची आयडिया आहे. गडकरी किंवा आणखी कोणाची ही आयडिया नाही. महाराष्ट्रात जे दोन तुकडे केले त्याचे पैसे कुठून आले? देशात जिथे जिथे सरकार पाडले त्याचे पैसे कुठून आले? पक्ष फोडण्याचे काम अमित शाह करत आहेत. सीबीआय ईडी एक्सटॉर्शन करते. शिवसेना राष्ट्रवादीला याच पैशातून तोडल्याचा आरोप राहुल यांनी केला. सीबीआय आणि ईडी हे आरएसएसचे हत्यार असल्याचा आरोप त्यांनी केला.



३ टक्के असणाऱ्या लोकांच्या हातात न्यायव्यवस्था, मीडिया, पैसा, कॉर्पोरेट या सर्व गोष्टी त्यांच्या हातात आहे, असे म्हणत ८८% लोकांना प्रभूचे गुणगाण करावे आणि उपाशी मरत रहावे, असे सरकारकडून सांगितले जात आहे, असा आरोप राहुल गांधी यांनी पालघरमधील सभेत म्हटले आहे.

राहुल गांधी पुढे बोलताना म्हणाले की, केवळ ९० (आयएस) प्रशासकीय अधिकारी देश चालवत आहे. त्यात ८८ टक्के समाजातील लोक किती आहेत असा सवाल त्यांनी उपस्थित केला आहे. तर पिक विमा च्या मुद्यावरून पालघर मध्ये भारत जोडो यात्रेत राहुल गांधींनी मोदी सरकार जोरदार हल्लाबोल केला आहे.

पिकविम्यासाठी ३५ हजार करोड रुपये विमा कंपनीला देण्यात येतात या १६ कंपन्यांमध्ये तुमच्यातील एकाही व्यक्तीचे नाव मला दिसले नाही. जेव्हा दुष्काळ किंवा अवकाळी मुळे शेतकऱ्यांचे नुकसान होते, तेव्हा नुकसान झाल्यानंतर कंपन्यांकडून पिक विम्याचे पैसे मिळत नाहीत,जीएसटीतून आलेला तुमचा पैसा १६ कंपन्यांच्या हातात जातो तिथे तुमचा एकही माणूस नाही, असे म्हणत काही लोकांच्या हाती सर्व सूत्र असल्याचा आरोप राहुल गांधींनी केला आहे.

नेहमी गरीब लोकांची जमीन अधिग्रहण केली जाते कधी तुम्ही अदानीची जमीन अधिग्रहण केली असे ऐकले का पण तुम्ही आदिवासी समाजाच्या व्यक्तीकडे जा, त्याची जमीन अधिग्रहण केलेली असते असे म्हणत राहुल गांधींनी आदिवासींवर अन्याय होतो.अदानी यांची जागा अधिग्रहण होत नाही,केवळ ८८% लोकांची जागा अधिग्रहण केल्या जाते असे आदानी यांनी काय केले आहे की त्यांची जागा अधिग्रहण केल्या जात नाही,असा सवाल राहुल गांधींनी उपस्थित केला आहे.

## वंचित बहुजन आघाडी समोर ४ जागांचा प्रस्ताव ठेवला-संजय राऊत

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- महाविकास आघाडीमध्ये कोणी कोणाला पाडत नाही आम्हाला भाजपला पाडायचे आहे. प्रकाश आंबेडकर आणि आमच्यात काही चर्चा करणे गरजेचे आहे तर आम्ही स्वतंत्रपणे करू. आम्ही कोणालाही एकमेकांना निमंत्रण घेऊन बोलवत नाही, महाविकास आघाडी हे कुटुंब आहे प्रत्येकाने कधीही येऊन त्या बैठकीत चर्चेत सामील होऊ शकता, असे ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी म्हटले आहे.

दरम्यान संजय राऊत पुढे बोलताना म्हणाले की, उद्या जर आम्हाला वाटले की प्रकाश आंबेडकर आणि आमच्यामध्ये चर्चा करणे गरजेचे आहे तर आम्ही व्यक्तीगतरित्या स्वतंत्रपणे करु. वंचित बहुजन आघाडीच्या समोर ४ जागांचा प्रस्ताव आम्ही ठेवलेला आहे. त्यांनी जी आम्हाला यादी दिली होती २७ जागांची त्यातल्या ४ जागा आहेत. आम्हाला भाजपाला पाडायचे आहे. आम्हाला हुकूमशाहीला पाडायचे आहे. हे प्रकाश आंबेडकरांना माहित आहे.

त्या ४ जागांवरती आता वंचित बहुजन आघाडीच्या नेत्यांनी निर्णय घ्यायचा आहे आणि त्यांनी आम्हाला कळवायचे आहे की, या ४ जागांसंदर्भात तुमची भूमिका काय आहे. याच्यामध्ये बोलवण्याचा, न बोलवण्याचा , मानसन्मानाचा काही प्रश्नच येत नाही.

# कुणी कुठल्या पक्षाला किती निधी दिला याची माहिती उघड होणार

### सर्वोच्च न्यायालयाची एसबीआयला नोटीस!

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- गेल्या महिन्याभरापासून चर्चेत असणाऱ्या निवडणूक रोख्यांचा तपशील अखेर निवडणूक आयोगाने आपल्या संकेतस्थळावर जाहीर केला आहे. या तपशीलामध्ये कुणी किती रुपयांचे निवडणूक रोखे खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती रुपयांचे निवडणूक रोखे मिळाले, याची माहिती जाहीर करण्यात आली आहे. मात्र, कोणत्या व्यक्तीने वा कंपनीने कोणत्या राजकीय पक्षाला किती निधी दिला, याची माहिती मात्र समोर येऊ शकली नव्हती. आता यासंदर्भात महत्त्वाचा घटक असणारा निवडणूक रोख्यांचा विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयाने एसबीआयला नोटीस जारी केली आहे.

एसबीआयनं दिलेली माहिती निवडणूक आयोगानं जाहीर केल्यानंतर या प्रकरणी सर्वोच्च न्यायालयात याचिका करणाऱ्या एडीआर अर्थात असोसिएशन फॉर डेमॉक्रॅटिक रिफॉर्म्स संस्थेनं सर्व निवडणूक रोख्यांचे विशेष क्रमांक जाहीर करण्याची मागणी करणारी याचिका सर्वोच्च न्यायालयात दाखल केली होती. या याचिकेची दखल घेत न्यायालयाने यासंदर्भात एसबीआयला विशेष क्रमांक जाहीर करण्यासंदर्भात नोटीस बजावली आहे. त्यासोबतच निवडणूक आयोगाने निवडणूक रोख्यांसंदर्भातली सर्वोच्च न्यायालयाच्या ताब्यात दिलेली सीलबंद माहिती आयोगाला पुन्हा देण्याचीही न्यायालयाने यावेळी परवानगी दिली.

एसबीआयकडून माहिती जाहीर करण्यासाठी मुदतवाढ देण्याची विनंती न्यायालयात करण्यात आली तेव्हाच प्रत्येक निवडणूक रोख्याला देण्यात आलेल्या विशेष क्रमांकावरही युक्तिवाद झाला. कुणी कोणत्या पक्षाला किती निधी दिला, हे समजण्यासाठी हा विशेष क्रमांक महत्त्वाचा दुवा आहे. सध्या एसबीआयनं जाहीर केलेली माहिती दोन प्रकारांमध्ये विभागलेली आहे. कुणी किती रकमेचे निवडणूक रोखे खरेदी केले आणि कोणत्या राजकीय पक्षाला किती रकमेचे निवडणूक रोखे मिळाले या प्रकारची वेगवेगळी माहिती सध्या एसबीआयनं जाहीर केली असून प्रत्येक निवडणूक रोख्यांना असणाऱ्या या विशेष क्रमांकाच्या मदतीने कुणी कोणत्या पक्षाला किती निधी दिला, हे स्पष्ट होऊ शकणार आहे!

## इलेक्टोरल बाँड्स आजपर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा-प्रकाश आंबेडकर



मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- केंद्रीय निवडणूक आयोगाने आज बहुचर्चित निवडणूक रोख्यांची माहिती संकेतस्थळावर प्रसिद्ध केली आहे. यामध्ये सर्वात जास्त लाभ भाजपला झाल्याचे दिसून येत आहे. त्यानंतर तृणमूल काँग्रेस, काँग्रेस यांचा नंबर दिसून येत आहे. या सर्व घडामोडींबाबत माध्यमांवर प्रतिक्रियांचा वर्षाव होत आहे. यावर वंचित बहुजन आघाडीचे नेते ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी देखील आपली प्रतिक्रियाॅं हॅंडलवर दिली आहे.

प्रकाश आंबेडकर यांनी एक्सवर लिहिले की, केंद्र सरकारची २०१८ ची इलेक्टोरल बाँड्स योजना देशातील आजपर्यंतचा सर्वात मोठा घोटाळा ठरला आहे. तसेच, इलेक्टोरल बाँड्सच्या माध्यमातून भाजपने एकूण ६ हजार ६० कोटी रुपये कमावल्याची टीकाही आंबेडकर यांनी केली आहे. आता भाजप-आरएसएस सरकारने कंपन्यांना इलेक्टोरल बाँड्ससाठी काय ऑफर दिली आहे, हे पाहणे मनोरंजक ठरणार असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.

# इलेक्टोरल बॉण्डची श्वेतपत्रिका देशासमोर सादर करा, खासदार सुप्रिया सुळेंची मागणी



पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- इलेक्टोरल बॉण्डसंदर्भातील श्वेतपत्रिका काढण्यात यावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केली आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाने इलेक्टोरल बॉण्ड्सचा तपशील १२ मार्चला निवडणूक आयोगाकडे सुपूर्द केला. निवडणूक आयोगाने गुरुवारी संपूर्ण यादी वेबसाईटवर अपलोड केली आहे. राजकीय पक्षांना फंड्स देणाऱ्याची संपूर्ण माहिती आयोगाने आता सार्वजनिक केली आहे. त्यामुळे सुप्रिया सुळे यांनी ही मागणी केली आहे.

प्रसार माध्यमांशी आज सुप्रिया सुळे यांनी संवाद साधला. यावेळी त्या म्हणाल्या की, इलेक्टोरल बॉण्डसंदर्भात आम्ही सर्वांनी संसदेत गंभीर प्रश्न उपस्थित केले होते. त्याच इलेक्टोरल बॉण्डबाबतची गंभीर परिस्थिती समोर आली आहे. या संदर्भातील जी काही माहिती समोर आली आहे, ती माहिती धक्कादायक आहे. जे काही महत्त्वाचे ठराविक इन्फ्रास्ट्रक्चर कंपन्या आहेत, त्यांची नावे या इलेक्टोरल बॉण्डच्या यादीत आहेत. गेमिंग आणि गॅम्बलिंग करत असलेल्या कंपन्यांची नावे सुद्धा या यादीमध्ये आहेत. ज्या कंपनीवर ईडी, सीबीआयच्या केसेस आहेत, असा कंपनींची नावे देखील या इलेक्टोरल बॉण्डच्या यादीत आहेत, असे सुप्रिया सुळे यांच्याकडून सांगण्यात आले.

## कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा यांच्यावर पॉक्सो कायद्यांतर्गत गुन्हा दाखल

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- भाजपचे ज्येष्ठ नेते आणि कर्नाटकचे माजी मुख्यमंत्री बी. एस. येडियुरप्पा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोक्सो ॲक्ट अंतर्गत येडियुरप्पा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १७ वर्षांच्या मुलीच्या आईनं दाखल केलेल्या तक्रारीवरुन येडियुरप्पा यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

द हिंदूनं दिलेल्या वृत्तानुसार, सदाशिवनगर पोलिसांनी गुरुवारी (१४ मार्च) रात्री उशिरा भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी मुख्यमंत्री बी.एस. येडियुरप्पा (८१) यांच्यावर गुन्हा दाखल केला. १७ वर्षांच्या मुलीच्या आईनं केलेल्या तक्रारीवरून लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणात हा गुन्हा नोंदवण्यात आल्याची माहिती मिळत आहे. लैंगिक अत्याचारापासून बालकांचे संरक्षण कायदा, २०१२ (पॉक्सो) च्या कलमाखाली कर्नाटकच्या माजी मुख्यमंत्र्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला. पोलीस सूत्रांनी द हिंदूला दिलेल्या माहितीनुसार, कायद्याच्या कलम ८ आणि भारतीय दंड संहितेच्या कलम ३५४ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# साध्वी प्रज्ञासिंह ठाकूरांनंतर सुधाकर द्विवेदीविरोधात वॉरंट जारी

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- मालेगाव २००८ बॉम्बस्फोट प्रकरणाची सुनावणी करणाऱ्या मुंबई सत्र न्यायालयातील विशेष एनआयए कोर्टाने आरोपी क्रमांक १० सुधाकर द्विवेदी उर्फ दयानंद पांडे याच्या विरोधात १० हजार रुपयांचे जामीनपात्र वॉरंट जारी केले आहे. पुढील सुनावणीत हजर न झाल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी होणार असल्याचे कोर्टाने म्हटले आहे.

मालेगाव २००८ बॉम्बस्फोट प्रकरणातील आरोपी सुधाकर द्विवेदीविरुद्ध जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले आहे. कोर्टानं नुकतंच या प्रकरणात आरोपी असलेल्या साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधातही जामीनपात्र वॉरंट जारी केला आहे.

सुनावणीच्यावेळी सुधाकर द्विवेदीही न्यायालयात सातत्यानं गैरहजर राहिले आहेत. त्यामुळे विशेष न्यायाधीश लाहोटी यांनी याबाबत गंभीर दखल घेतली आहे. सुधाकर द्विवेदी विरोधात १० हजार रुपयांचं जामीनपात्र वॉरंट जारी करण्यात आले. पुढील सुनावणीत हजर न राहिल्यास अजामीनपात्र वॉरंट जारी होणार असल्याचेही कोर्टाने म्हटले आहे.

मालेगाव बॉम्बहल्ल्यातील आरोपी प्रज्ञासिंह ठाकूर तसेच इतर आरोपींना मुंबईच्या विशेष न्यायालयाने सोमवारी कोर्टात हजर राहण्याचा आदेश दिला होता. मात्र प्रज्ञासिंह ठाकूर न्यायालयात हजर राहिल्या नाही. त्याऐवजी ठाकूर यांच्या वकिलाने प्रज्ञासिंह यांची प्रकृती ठीक नसल्याचे सांगत सूट देण्याची मागणी केली होती. विशेष न्यायाधीश ए के लाहोटी यांनी मात्र हा अर्ज फेटाळत प्रज्ञासिंह ठाकूर यांच्याविरोधात जामीनपात्र वॉरंट जारी केले. मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणी न्यायालयाने एनआयएला २० मार्चपर्यंत अहवाल सादर करण्याचा आदेश दिला आहे.

## अमेरिकेने सीएएवर केलेल्या टिप्पणीला भारताचे चोख प्रत्युत्तर

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- केंद्र सरकारने लोकसभा निवडणुकीला अवघे काही दिवस उरले असताना नागरिकत्व दुरुस्ती कायद्याची अधिसूचना काढली. या कायद्यावर देशातील विरोधी पक्ष टीका करत असतानाच अमेरिकेनेही गुरुवारी सीएए वर बोलताना चिंता व्यक्त केली होती. अमेरिकेच्या टिप्पणीनंतर आता भारताने त्याचा जोरदार पलटवार केला आहे. अमेरिकेची टिप्पणी चुकीची, गैरसमजूतीची आणि अवास्तव आहे, अशी प्रतिक्रिया भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने दिली आहे. तसेच सीएए हा आमचा अंतर्गत विषय असून आमची सर्वसमावेश परंपरा आणि मानवी हक्कांसाठी दीर्घकालीन उद्दिष्टांचा एक भाग आहे. (पान ४ वर)

# सरकारची ईडी सीबीआयच्या माध्यमातून लोकांना धमक्या देऊन वसुली सुरु; जयराम रमेश यांचा हल्लाबोल

मुंबई दि.१५ (प्रतिनिधी)- निवडणूक आयोग या निष्पक्ष असलेल्या संस्थेवरील आमचा विश्वास उडत आहे, हा आमचा लोकशाहीसाठी धोका असल्याचे मत काँग्रेस नेते जयराम रामेश यांनी व्यक्त केले. इंडिया आघाडीमधील पक्षांना निवडणूक आयोगाने गेल्या दहा महिन्यांपासून भेट का नाकारली? आज हा अजून आमच्या समोर प्रश्न असल्याची प्रतिक्रिया जयराम रमेश यांनी बोलताना दिली. काँग्रेस नेते राहुल गांधी यांची भारत जोडो न्याय यात्रा मुंबईच्या वेशीवर पोहोचली असून या यात्रेचा समारोप उद्या (१६ मार्च) मुंबईमध्ये होणार आहे. जयराम रमेश म्हणाले की, भारत जोडो यात्रेचा आज ६२ वा दिवस असून उद्या भारत जोडो यात्रेचा शेवटचा दिवस असेल. उद्या याच दिवशी लोकसभा निवडणुकीची घोषणा होणार आहे. या सर्व पार्श्वभूमीवर जयराम रमेश यांनी आपलं मत व्यक्त केले. ते म्हणाले की, भारत जोडो यात्रा ही आमच्यासाठी आणि कार्यकर्त्यांसाठी बूस्टर डोस होता.

निवडणूक रोखांवरून सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्णयाचे स्वागत जयराम रमेश यांनी केलं. ज्या कंपन्यांना सरकारने ठेका दिला त्यांच्याकडून सरकारला निधी देण्यात आला असून सरकारची हप्ता वसूली असल्याचा आरोप जयराम रमेश (पान ४ वर)

## शिंदे गटात गेलेले १२ आमदार ठाकरेंकडे परतणार; वकील असीम सरोदेंचा दावा

चंद्रपूर दि.१५ (प्रतिनिधी)- शिवसेना शिंदे गटातील तब्बल १२आमदार उद्धव ठाकरे यांच्या शिवसेनेत परतणार, असा खळबळजनक दावा प्रसिद्ध वकील असीम सरोदे यांनी केला आहे. चंद्रपूर येथील निर्भय बनो सभेत त्यांनी हा दावा केला आहे.. इतकेच नाही, तर असीम सरोदे यांनी १२ आमदारांच्या नावांची यादी देखील वाचून दाखवली आहे. यामुळे राजकीय वर्तुळात मोठी खळबळ उडाली आहे.

दरम्यान महायुतीमध्ये जागावाटपाबाबत चर्चा सुरू आहेत. दोन दिवसात जागावाटप होईल असे बोलले जात आहे. भाजपने शिंदे गटाच्या आधीपेक्षा जागा कमी केल्या असल्याचे बोलले जात आहे, त्यामुळे शिंदे गटातील नेत्यांमध्ये नाराजीचा सुर असल्याचे बोलले जात आहे, (पान ४ वर)

# स्त्री भ्रूणहत्या विरूद्ध लढा- स्त्रियांच्या अस्तित्वाचा लढा

**स्त्री**भ्रूण हत्यांचे प्रमाण वाढले आहे आणि वाढतच जाणार आहे कारण पुरूष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांना सर्वच बाबतीत गौणत्व दिले गेलेले आहे. स्त्रियांना जाणूनबुजून दुय्यम वागणूक दिली जात आहे. एक उपभोग्य वस्तू म्हणूनच अजूनही तिच्याकडे बघितले जाते. कोणत्याही बाबतीत तिला वरचढ होऊ दिले जात नाही. जन्मल्यापासून ती नाजूक आहे तिने पुरूषापुढे यायचेही नाही. घराच्या भिंतीतच रहायचे कायम मान खाली घालूनच वावरायचे. व्यायाम करायचा नाही. मैदानी खेळ खेळायचे नाही व प्रथम वडिलांच्या नंतर नवऱ्याच्या व मग मुलांच्या धाकातच जीवन घालवायचे. शिकायचे नाही, शिकलेच तर नोकरी करायची नाही. उद्योगधंदा करायचे मनातही आणायचे नाही. उद्योग करायचाच झाला तर झाडणे, भांडी घासणे, धुणी धुणे किंवा स्वयंपाक करणे. जन्मभर चार भिंतीच्या आड 'बांधा वाढा उष्टी काढा' यातच आयुष्य घालवायचे आणि असे दुय्यम आयुष्य घालवण्यासाठी त्यांना नाजूक, सुंदर अनंत काळची माता, देवी असे गौरवून (फसवून) ठेवले जाते. त्यामुळे कायम असुरक्षिततेची भावना, अधिकाराचा अभाव व परावलंबित्व यामुळे खच्चीकरण केलेली स्त्री तशीच रहावी अशी आपली संस्कृती आहे. या संस्कृतीमुळेच स्त्री ही जोखीम होवून बसली आहे. तिच्यावर जन्मल्यापासून मरेपर्यंत कधीही बलात्कार होवू शकतो. तिच्या पालनपोषणाचा खर्च, तिच्या लग्नात द्यावा लागणारा निरनिराळ्या स्वरूपातील हुंडा व लग्नानंतरही पूर्ण ह्यात भर तिची सर्व प्रकारची काळजी घ्यावी लागत असल्यामुळे (सासरचे सदैव हात झटकून तिला आईबाबांकडेच ढकलत असल्यामुळे) ती कायमची जोखीमच होवून बसली आहे. त्यामुळेच पालकांना (विशेषत: सासरच्यांना) मुलीचा जन्म आपल्या घरात नकोसा झाला आहे. त्यामुळे जन्मत:च मुलीला निर्दयपणे मारून टाकणारे गरीब व सोनोग्राफी करून मुलगी असल्यास ॲबॉर्शन करून घेणारे श्रीमंत पालक हे दिवसेंदिवस वाढतच जाणार आहेत. कायदे करून व डॉक्टरांवर बंधने घालून या हत्या थांबणे अशक्य आहे. श्रीमंत लोक परदेशात जाऊन हेच करणार व गरीब चोरूनमारून हेच करणार. पैशाचा मोह सर्वांनाच आहे होता व असणारच आहे. पुढील सगळा खर्च वाचवण्यासाठी खर्च करणारच व डॉक्टर पैसे मिळविण्यासाठी हे करणारच. कायदे कितीही केले तरी त्यातून पळवाटा काढल्या जाणारच. स्त्रीचे महत्त्व समाजात वाढत नाही तोपर्यंत हे असेच चालणार.स्त्री प्रधान संस्कृती आली तरच ह्या हत्यांना आळा बसेल कुटुंबात स्त्री मुख्य, समाजात स्त्री महत्त्वाची, नोकऱ्यात स्त्री वरिष्ठ व भरपूर पगार घेणारी झाली व पुरूषांप्रमाणे व्यायाम करून स्वत:चे संरक्षण करणारी झाली तर ती जोखीम न राहता एक महत्त्वाची व्यक्ती बनू शकेल. लग्न झाल्यावर मुलीच्या घरी नवरा राहायला आला तर हुंडाबळी होवूच शकणार नाही. घरातले सगळे निर्णय घरातली मुख्य स्त्रीच घेवू लागली तर स्त्रीभ्रूण हत्या होवूच शकणार नाही. स्त्रियांचे प्रमाण कमी होण्यात स्त्रीभ्रूण हत्याच जबाबदार आहेत. हे असेच चालले तर एक दिवस स्त्री योनीच नष्ट होईल.

स्त्रीभ्रूण हत्या टाळणे स्त्रियांच्याच हातात आहे. पुरूषप्रधान संस्कृती असली तरीही प्रत्येक घरात स्त्रीच्या मताप्रमाणे प्रत्येक निर्णय घेतला जातो. हे सत्य म्हणायला पुरूषप्रधान संस्कृती असली तरीही प्रत्येक घरात स्त्रीचेच राज्य असते हे सत्य आहे. स्त्री पुढे घरातले पुरूष नेहमीच हार मानताना दिसतात. मग जर स्त्रीने ठरवले तर पुरूषप्रधान संस्कृतीचे स्त्रीप्रधान संस्कृतीत रूपांतर करणे स्त्रीला सहज शक्य आहे. यासाठी स्त्रियांनी जागे व्हायला पाहिजे. स्त्रियांची एकजूट व्हायला पाहिजे. महिला मंडळे किंवा भिशीसाठी एकत्र जमणाऱ्या स्त्रियांनी छानछोकी, कपडे, दागिने व सौंदर्यवर्धनाच्या वायफळ चर्चा करण्यापेक्षा स्त्रियांनी स्त्रियांचे महत्त्व वाढवण्यासाठी एका दिलाने काय प्रयत्न करता येतील याचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. घरात मुलींचा जन्म होत असेल तर जिवाच्या आकांताने त्याला पाठिंबा दिला पाहिजे. स्त्रीभ्रूण हत्येला सर्वशक्तीशी विरोध केला पाहिजे. त्यासाठी सर्व मार्गांचा उपयोग केला पाहिजे. घरातल्या मुलीला मुलासारखेच वाढवले जाते आहे. याकडे डोळ्यात तेल घालून लक्ष द्यावे. मुलगी जास्तीत जास्त शिकेल याचा पाठपुरावा करावा. लहानपणापासून आपण मुलांपेक्षा कोणत्याही बाबतीत कमी नाही हे मुलींच्या मनावर बिंबवावे. तिला व्यायाम करून शरीर बळकट करण्यास प्रोत्साहन द्यावे. स्वसंरक्षण करण्याचे शिक्षण आवर्जुन द्यावे. लग्न ही गोष्ट गौण असून तेच जीवनाचे ध्येय असून स्वत:च्या हुशारीने व वर्तनाने आपले जीवन जगणे हे जास्त महत्त्वाचे आहे. असे सतत बिंबवावे. स्वत:च्या आत्मविश्वास स्वत:च्या प्रयत्नानेच वाढवण्यास प्रोत्साहन द्यावे.

लग्नाच्या वेळी मुलीच्या पालकांनी दुय्यम वागणूक घेण्याचे टाळावे. मुलीप्रमाणेच मुलालाही लग्नाची जरूरत असते. त्यामुळे बरोबरीच्या नात्यानेच लग्न व्हावे. कोणत्याही रूपाने हुंडा देण्याचा विरोध करावा. लग्नानंतर मुलीला सासरी न पाठवता जावयाने मुलीच्या घरी राहण्यास यावे ज्यावेळी स्वतंत्र घर घेईल तेव्हाच मुलीला तिच्या स्वतंत्र घरात राहण्यास पाठवावे. यामुळे हुंडाबळी होवूच शकणार नही. शिकलेल्या व स्वत:च्य पायावर उभ्या असलेल्या मुलीवर कोणीही कसलीही बळजबरी करू शकणार नाही. तिला मूल व्हावे का नाही याचा निर्णय सर्वस्वी तिचाच असावा व त्या निर्णयाला दोन्ही घरातील स्त्रियांनी खंबीरपणे पाठिंबा द्यावा. लग्नानंतरही मुलीची सतत काळजी घेणे व आईवडिलांचे कर्तव्य आहे व ते कर्तव्य आम्ही जन्मभर पाळू याचा मुलीला सतत दिलासा द्यावा. स्वाभिमानी व कर्तृत्ववान मुली आई-वडिलांवर मानसिक दिलासा देण्याचे कर्तव्य आईने करावेच. विज्ञानाने हे सिद्ध झालेले आहे की स्त्री ही जास्त चिवट, झुंझणारी व शारीरिक व मानसिक दृष्ट्या पुरूषांपेक्षा बळकट आहे. स्त्रियांनी हे आपले गुण न विसरता खंबीरपणे स्वत:च्या अस्तित्वाचा लढा प्राणपणाने लढायचे ठरवले तरच स्त्रीचे समाजातील महत्त्व वाढून स्त्रीभ्रूण हत्येला आपोआपच आळा बसेल.

# आयुष्यभर देशहितासाठी प्राणपणाने झटणारे क्रांतीवीर बाबाराव सावरकर

**क्रांतीवीर गणेश दामोदर तथा बाबाराव दामोदर सावरकर हे स्वा. विनायक दामोदर सावरकर यांचे थोरले बंधू. त्यांनीच स्वा. सावरकरांना पितृतुल्य प्रेम देऊन, अत्यंत हालअपेष्टा सोसून लहानाचे मोठे केले आणि त्यांच्या बरोबरीने क्रांतीकार्यातही भाग घेतला. १६ मार्च या दिवशी बाबाराव सावरकर यांचा स्मृतीदिन आहे. यानिमित्त हा लेखप्रपंच .....**



**बाबारावांचा** जन्म नाशिक जिल्ह्यातील भगूर या गावी १३ जून १८७९ रोजी झाला. लहानपणी त्यांची प्रकृती नाजूक होती. सहाव्या वर्षापासून चौदाव्या वर्षापर्यंत त्यांना सुमारे दोनशे वेळा विंचूदंश झाले. पुढील क्रांतीकारी आयुष्यात यातना सहन करण्याची शक्ती यावी, अशीच ही निसर्गाची योजना असावी. तरुण वयातही त्यांनी स्वत:च्या शरीरास मुद्दामहून खूप कष्ट दिले. कडक थंडीतदेखील ते उघड्या अंगाने, पांघरूण न घेता घराबाहेर झोपत. त्यांच्या डोक्यात क्रांतीचेच विचार सतत घोळत असत. बलाढ्य ब्रिटीश साम्राज्याविरुद्ध क्रांती करणे हे एकट्यादुकट्याचे काम नाही, तर त्यासाठी प्रबळ आणि कट्टर संघटना आवश्यक आहे, हे बाबारावांनी लहान वयातच हेरले. यासाठी 'मित्रमेळा' या संघटनेची स्थापना करण्यात आली. राष्ट्रगुरु रामदासस्वामी, छत्रपती शिवाजी महाराज, नाना फडणवीस आदी थोर पुरुषांच्या जयंत्या जाहीर सभा घेऊन साजऱ्या करण्यास त्यांनी सुरुवात केली. त्यामुळे तरुणांत आणि जनतेत देशभक्ती जागृत होण्यास खूपच मदत झाली. या निमित्ताने लोकमान्य टिळक, 'काळ' या वर्तमानपत्राचे संपादक शिवराम महादेव परांजपे यांची देशभक्तीने रसरसलेली भाषणे नाशिककरांना ऐकण्याची संधी प्राप्त झाली.

**वन्दे मातरम् अभियोग !**

बाबारावांचा ('साहेब' हा शब्द फारसी. त्यामुळे साहेब ऐवजी 'राव' हा शब्द सावरकरबंधूंनी रूढ केला. जसे बाबाराव, तात्याराव) ब्रिटीश शासनाशी पहिला संघर्ष १९०६ साली उडाला. नाशिकमध्ये जाहीर सभा घेण्यास असलेली बंदी मोडली, या गुन्ह्यासाठी त्यांना अटक करण्यात आली आणि १० रुपये दंड करण्यात आला. बाबारावांनी याविरुद्ध वरिष्ठ न्यायालयाकडे दाद मागितली आणि त्यांचा दंड रद्द झाला. २७ सप्टेंबर १९०६ रोजी दसऱ्यानिमित्त नाशिक येथील कालिकेच्या मंदिराकडून सीमोल्लंघन करून परतणाऱ्या तरुणांनी 'वन्दे मातरम'चा जयघोष केला. तो ऐकून एका पोलिसाने 'बोंब मारणे बंद करा', असे म्हणत बाबांच्या अंगावर हात टाकला. मात्र त्या पोलिसावरच पश्चातापाची पाळी आली. बाबांसह सर्वांनीच त्या पोलिसाला ठोकून काढले ! या प्रसंगाने संतप्त झालेल्या ब्रिटीश सरकारने ११ तरुणांवर अभियोग भरला. 'वन्दे मातरम् अभियोग' या नावाने तो गाजला. यात बाबाराव मुख्य आरोपी होते. नाशिक जिल्ह्यात हा अभियोग निरनिराळया ठिकाणी सहा महिने चालला; कारण न्यायाधीश फिरतीवर असत आणि ते असतील तेथे हा अभियोग चालत असे. या अभियोगात बाबारावांना २० रुपये दंड होऊन मोठ्या रकमेचा प्रतिभू (जामीन) मागण्यात आला. अन्य तरुणांनाही अशाच प्रकारच्या शिक्षा झाल्या. बाबाराव नाशिकमध्ये असतांना त्यांनी राष्ट्रहिताच्या दृष्टीने मूलभूत स्वरूपाच्या अनेक चळवळी सुरू केल्या. स्वदेशी चळवळ, विलायती मालावर बहिष्कार, राष्ट्रीय शिक्षणाची सुरुवात इत्यादी चळवळींचे सूत्रसंचालन बाबाराव धुरिणत्वाने करत असत.

**प्रकाशक बाबाराव !**

याच सुमारास बाबारावांचे पाठचे बंधू स्वा. वि.दा. सावरकर लंडनमध्ये शिक्षण घेत होते. १९०६ साली स्वा. सावरकरांनी लिहिलेले प्रसिद्ध इटालियन क्रांतीकारक जोसेफ मॅझिनी यांच्या चरित्राचे हस्तलिखित बाबारावांकडे आले. ब्रिटिशांच्या दृष्टीने हे चरित्र अत्यंत स्फोटक होते. जून १९०७ मध्ये बाबारावांनी हे पुस्तक प्रसिद्ध केले. दोन महिन्यांतच २ सहदा प्रतींची पहिली आवृत्ती जवळ जवळ संपली.

संकलक : कु. प्रियांका लोणे,
मराठवाडा संघटक, हिंदु जनजागृती समिती

पुस्तकाच्या विषयाबरोबर बाबांचे परिश्रमही याला कारणीभूत होते. या पुस्तकाला स्वा. सावरकरांनी लिहिलेली २६ पृष्ठांची प्रस्तावना त्या वेळी अनेकांनी मुखोद्गत केली. यातील ज्वलंत विचारांनी प्रभावित होऊन अनंत कान्हेरे यांनी नाशिकचा जिल्हाधिकारी जॅक्सन याचा वध केला. लवकरच स्वा. सावरकरांनी लिहिलेल्या आणि हॉलंडमध्ये मुद्रित केलेल्या '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' या ग्रंथाच्या प्रती बाबारावांच्या हाती आल्या. बाबारावांनी या प्रतीही अत्यंत गुप्तपणे क्रांतीकारकांपर्यंत पोहोचवल्या. या अद्वितीय ग्रंथामुळे ब्रिटिशांविरुद्ध बंगाल, पंजाब आणि महाराष्ट्रात 'गदर' पक्षाची स्थापना होऊ शकली ! 'अभिनव भारत' संघटनेतील युवकांना आपण कोणत्या आगीशी खेळत आहोत, तसेच आपल्या कृत्यांना भारतीय दंडविधानात (इंडियन पिनल कोड) कोणत्या शिक्षा सांगितल्या आहेत, हे कळावे म्हणून भारतीय दंडविधानाची एक छोटी आवृत्तीही बाबारावांनी छापून घेतली होती. भावनेच्या आहारी जाऊन नव्हे, तर समजून उमजून तरुणांनी क्रांतीकार्याला हात घालावा, हा उद्देश यामागे होता ! लंडनहून स्वा. सावरकरांनी हातबॉंब तयार करण्याचे तंत्र शिकवणारे कागदपत्र सेनापती बापट यांच्यामार्फत बाबारावांकडे पाठवले. बाबारावांनी हातबॉंब तयार करण्याची ही कृती क्रांतीकारकांपर्यंत पोचवली. या कृतीवरूनच खुदिराम बोस यांनी न्यायाधीश किंग्जफोर्ड याच्या गाडीवर हिंदुस्थानात सिद्ध झालेला पहिला बॉंब टाकला !

**१ महिना सश्रम कारावास !**

या सर्व व्यापांमुळे बाबारावांना अटक करण्याची संधी ब्रिटीश शासन शोधू लागले. ११ जून १९०८ रोजी शिवरामपंत परांजपे यांना पुण्यात अटक करण्यात आली आणि दुसऱ्याच दिवशी मुंबईला आणून त्यांच्यावर अभियोग सुरू करण्यात आला. स्वराज्य चळवळीसंबंधी परांजपे यांच्या ओघवत्या आणि परिणामकारक वक्तृत्वाने अनेक तरुण भारले होते. त्यामुळे परांजपे यांच्या अटकेने बाबारावांसहित अनेक तरुण प्रक्षुब्ध झाले. त्यांना काही मदत करावी या हेतूने बाबारावही मुंबईत आले. तेथील न्यायालयासमोर एका खोजा जमातीच्या व्यापाऱ्याला पोलीस अधिकारी खूप त्रास देत असलेला बाबारावांनी पाहिला. बाबारावांचे तरुण रक्त उसळून आले. त्या व्यापाऱ्यास पाठीशी घालून बाबारावांनी त्या पोलीस अधिकाऱ्याशी वितंडवाद घालवयास सुरुवात केली. त्यामुळे चिडून पोलिसांनी बाबारावांनाच अटक केली. हे काय प्रकरण चालले आहे हे पाहण्यासाठी वरिष्ठ पोलीस अधिकारी गायडर बाबारावांकडे आला आणि त्याने त्यांचे नाव विचारले. 'बाबा सावरकर' हे नाव ऐकताच गायडरला अत्यानंद झाला. त्याने ताबडतोब बाबारावांची झडती घेतली तेव्हा त्यांच्याजवळ रशियन क्रांतीसंबंधीचे एक पत्रक सापडले. त्या पत्रकाच्या आधारे बाबारावांना एक महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा झाली. ती त्यांनी ठाणे आणि नाशिक येथील कारागृहांत आनंदाने भोगली.

**जन्मठेपेची शिक्षा !**

क्रांतीकारकांच्या अनेक गुप्त उद्योगांत बाबाराव सावरकरांचा हात आहे आणि त्यांना त्यांचे मार्गदर्शनही लाभले आहे, हे ब्रिटीश गुप्तहेर खात्याने ओळखले होते. १९०९ मध्ये बाबारावांनी कवी गोविंद रचित चार क्रांतीकारी कविता प्रसिद्ध केल्या. त्यांपैकी 'रणावीण स्वातंत्र्य कोणा मिळाले ?' या कवितेत प्रतिपादले होते की, गुलामगिरीत खितपत पडलेल्या जगातील कोणत्याही देशाला सशस्त्र क्रांतीशिवाय स्वातंत्र्य मिळाले नाही. मग त्याला हिंदुस्थानच कसा अपवाद असेल ? या कविता प्रसिद्ध केल्या म्हणून सरकारने बाबारावांना अटक करून जन्मठेपेची अतिशय कठोर शिक्षा दिली. ८ जून १९०९ रोजी बाबारावांना शिक्षा होऊन अंदमानात नेण्यात आले. त्या वेळी ते जेमतेम ३० वर्षांचे होते !

**अंदमान -**

अंदमानातील 'सेल्युलर जेल'मध्ये असतांना बाबारावांच्या शारीरिक यातनांना **( पान ३ वर )**

# महावितरणची 'ग्राहकांसाठी' ग्राहकाभिमुख डिजीटल सेवा

**'आमच्याकडे** आलेले ग्राहक हे फार मोलाचे आहेत. ग्राहक हे आमच्यासाठी नसून आम्ही ग्राहकांसाठी आहोत. ग्राहक हे आमच्या कामामध्ये व्यत्यय नसून ते आमच्या कामाचा गाभा आहेत. ग्राहक कोणी परके नसून खऱ्या अर्थाने आमचे आधारस्तंभ आहेत. त्यांची सेवा करून आम्ही त्यांच्यावर उपकार करीत नाही. तर सेवा करण्याची संधी देउन तेच आम्हाला उपकृत करीत आहेत.' असे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांनी म्हटले आहे.

आधुनिक जीवनशैलीत जीवन जगतांना क्षणा क्षणाला विजेची आवश्यकता भासते. ' विजेशिवाय मानवी जीवन अधुरे आहे' असे म्हटले तरी वावगे ठरू नये. आधुनिकीकरणच संपूर्ण विजेवर अवलबुंन आहे. विजेशिवाय विकासही अशक्य आहे. राज्याला गेल्या ६३ वर्षांपासून महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी म्हणजे महावितरण ही राज्यातील शहरी, निमशहरी, दुर्गम, अतिदुर्गम व दऱ्याखोऱ्यात असलेल्या सर्व घरगुती, वाणिज्यिक, औद्योगिक, कृषी, पथदिवे, सार्वजनिक पाणीपुरवठा व इतर सर्व वीजग्राहकांशी प्रकाशाचे, विश्वासाचे नाते अभेद्य ठेवत ग्राहकसेवा देत आहे व आश्वासक वाटचाल करीत आहे. महावितरणने राज्याच्या प्रगतीमध्ये आजवर दिलेल्या योगदानामुळे गेल्या ६३ वर्षांपासून वीजग्राहकांशी असलेले आपुलकीच्या सेवेचे, विश्वासाचे नाते अधिकच वृध्दींगत झाले आहे. राज्यात महावितरणचे घरगुती- २ कोटी २६ लाख, वाणिज्यिक- २२ लाख २६ हजार, वाणिज्यिक २२ लाख २४ हजार, औद्योगिक- ४ लाख ७१ हजार, कृषी ग्राहक ४६ लाख ९९ हजार, पथदिवे व सार्वजनिक पाणीपुरवठा व इतर असें ३ लाख ७४ हजार वीजग्राहक आहेत. असे एकूण राज्यात ३ कोटी ३ लाख ७० हजार ६८ ग्राहक राजांना 24 x 7 अखंडित अविरत डिजिटसेवा माध्यमातून सेवा प्रदान करण्याच भाग्य महावितरण कंपनीला लाभले आहे. आशिया खंडातील नामांकित व तत्पर ग्राहक सेवेमुळे अनेक पदकांचे तुरे शिरपेचात रोवलेली अशी महावितरण कंपनीची सर्वदूर ख्याती आहे. महावितरण राज्यातील सुमारे तीन कोटी तीन लाख ७० हजार पेक्षा जास्त वीजग्राहकांना अखंड, सुरळित व दर्जेदार वीजपुरवठा करण्याचे काम करत आहे. महावितरण आधुनिक युगात दिवसेन दिवस काळाची गरज लक्षात घेता सेवेत सतत सुधारणा करत वीज ग्राहकांना दर्जेदार सेवेबरोबरच विनाकष्ठ सुलभ डिजीटल सेवा देण्याचा प्रयत्न सातत्याने करत आहे. वीज ग्राहकांना या सेवा प्रदान करतांना महावितरण अत्याधुनिक सेवेकडे पाउल टाकत नवनवीन संशोधात्मक ई सेवा देण्याकडे प्राधान्य दिले जात आहे. म्हणूनच महावितरण ही वीज सेवा देणारी आशिया खंडातील सर्वात मोठी कंपनी म्हणून ओळखली जाते. महावितरणचे हे 'लौकिक' अविरत सेवेने टिकवून ठेवण्यासाठी कर्मचारी सतत प्रयत्नशिल आहेत. जागतिक ग्राहक दिनानिमित्त महावितरणच्या ग्राहकाभिमुख डिजीटल सेवांचा ग्राहकांनी पुरेपुर लाभ घेतला पाहिजे.

महाराष्ट्र राज्यातील ४५७ शहरे व ४१ हजार ९५ गावांना वीजपुरवठा करणाऱ्या महावितरणने झपाट्याने वीज यंत्रणा उभारत सर्वच वर्गवारीमध्ये मागेल त्यांना नवीन वीजजोडणी, मागणीप्रमाणे वीज देण्याची सक्षम वीज यंत्रणा निर्माण केली आहे. महावितरण कंपनीला देश पातळीवरील अनेक पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. ग्राहकांच्या आधुनिक जीवनशैलीशी सुसंगत सेवा देण्यासाठी महावितरणने आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब केला आहे. १५ मार्च या 'जागतिक ग्राहक दिनानिमित्त' महावितरणच्या ग्राहकाभिमुख डिजीटल सेवांचा ग्राहकांनी लाभ घेतला पाहिजे.

विजेच्या मुलभुत समस्या जाणून घेवून तेथेच या समस्यांचे निराकरण करण्यात येत आहे. यामध्ये प्रामुख्याने लोबंकळणाऱ्या तारा सरळ करणे, झुकलेले खांब सरळ करणे, वाहिन्यांवरील झाडांच्या फांद्या काढणे, वितरण रोहित्रांचे बॉक्स आणि केबल दुरूस्त करणे, नव्याने आर्थिंग करणे, गंजलेले खांब बदलणे, सिंगलफेजचे नादुरूस्त मिटर बदलणे, घरात असणारे वीज मीटर दाराबाहेर लावणे, चुकीचे वीज बिल दुरूस्त करणे, प्रलंबित नवीन वीज जोडणी देणे, एबी स्वीच बदलणे, रोहित्राभोवती असणारे गवत काढून स्वच्छ करणे, वीज चोरीचे आकडे काढणे आदी कामे करण्यात येत आहेत. तसेच वीज अपघात टाळण्यासाठी लोकप्रबोधन करणे, ऑनलाईन वीज बिल भरणे, नवीन वीज जोडणीची मागणी करणे इत्यादी सुविधांची प्रात्यक्षिक मोबाईलवर गावातील लोकांना करून दाखविणे. वीज बिल वसूल करणे इत्यादी उपक्रम या गावात करण्यात येत आहेत.

वीजबिल भरण्यासाठी ग्राहकांना बिल भरणा केंद्रासमोर रांगेत उभे राहण्याचे कष्ट व वेळ वाचावा म्हणून ऑनलाईन पेमेंट सेवा सुरू करण्यात आलेली आहे. ऑनलाईन बिल भरणा सुविधा www.mahadiscom.in या वेबसाईटवर व महावितरणच्या मोबाईल ॲपवर उपलब्ध आहे. मोबाईल ॲपवर चालू व मागील वीजबिल पाहता येते. बिल भरण्यासाठी नेटबँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्डसह मोबाईल वॉलेट व कॅश कार्डचा पर्याय उपलब्ध आहे. बिल भरल्यावर पावतीचा तपशीलही मिळतो. ग्राहकांना एकाच खात्यातून स्वत:च्या अनेक वीज जोडण्यांबाबतची सेवा मोबाईल ॲपमध्ये मिळते. मुदतीनंतरही ऑनलाईन पेमेंट करता येते.

ग्राहकांना वीजबिलाचा तपशील, वीजपुरवठा बंद असल्याचा कालावधी किंवा देखभाल व दुरुस्तीच्या कालावधीची माहिती एसएमएसद्वारे पाठवण्यात येते. त्यासाठी ग्राहक क्रमांकासोबत मोबाईल क्रमांक नोंदवणे आवश्यक आहे. consumerinfo.mahadiscom.in या लिंकवर किंवा टोल फ्री क्रमांकावर नोंदणी करता येते. तसेच नोंदणी करावयाच्या मोबाईल क्रमांकावरून MREG टाईप करा व त्यापुढे स्पेस देऊन आपला ग्राहक क्रमांक टाकून ९२२५५९२२५५ या क्रमांकावर पाठवा.

महावितरणने ग्राहकांसाठी २४ तास सुरू असणारे मध्यवर्ती ग्राहक सुविधा केंद्रातून 24 x 7 अशी टोल फ्री क्रमांकावरून कॉल सेंटर सुरू केलेले आहे. वीज सेवेबाबत तक्रारीसाठी दूरध्वनी व मोबाईलधारकांसाठी १९१२, १९१२०, १८००-२१२-३४३५ व १८००-२३३-३४३५ हे तीन टोल फ्री क्रमांक उपलब्ध आहेत. प्रामुख्याने खांडित वीजपुरवठ्यासह विविध प्रकारच्या तक्रारी या क्रमांकांवर करता येतात. ग्राहकांना तक्रार क्रमांक देण्यात येतो. तक्रारींचे निराकरण करण्याची कार्यवाही लगेच सुरू होते.

छापील बिलासह दरमाह ई-मेलवर वीजबिल मिळवण्यासाठी महावितरणच्या www.mahadiscom.in या वेबसाईटवर किंवा consumerinfo.mahadiscom.in या लिंकवर नोंदणी करावी. तेथे ग्राहक प्रकार (लघुदाब/उच्चदाब), ग्राहक क्रमांक व बिलिंग युनिट हा तपशील भरावा. त्यानंतर मोबाईल क्रमांक व ई-मेल टाकून एसएमएस सेवा व बिलाचा ई-मेल मिळवता येईल. या सेवेबरोबरच दरमाह छापील बिलही मिळण्याची सोय कायम राहील.

या सुविधेत छापील बिलाऐवजी ई-मेलद्वारे बिल मिळवण्याचा पर्याय लघुदाब वर्गवारीतील ग्राहकांना उपलब्ध आहे. गो-ग्रीनअंतर्गत ई-बिलाचा पर्याय निवडणाऱ्या ग्राहकांना बिलात १० रुपये सूट दिली जाते. www.mahadiscom.in या वेबसाईटवर गो-ग्रीन लिंकवर क्लिक करून ग्राहक क्रमांक व बिलिंग युनिट ही माहिती भरल्यास नोंदणी पूर्ण होईल. ही सुविधा केवळ महावितरणच्या नोंदणीकृत ग्राहकांसाठीच उपलब्ध असून ग्राहकांनी http://wss.mahadiscom.in/wss/wss या लिंकवर जाऊन आपली नोंदणी झाल्याची खात्री करून घ्यावी.

याचबरोबर महावितरण तर्फे खंडित वीज पुरवठ्याच्या तक्रारीसाठी मिसकॉल सेवा उपलब्ध करून देण्यात आली आहे व या क्रमांकात बदल करण्यात आला आहे. ग्राहक नोंदणीकृत मोबाईल क्रमांकावरून महावितरणने उपलब्ध करून दिलेल्या ०२२- ५०८९७१०० या क्रमांकावर मिसकॉल देऊन आपली तक्रार नोंदवू शकतात. ज्या ग्राहकांनी अद्याप आपले मोबाईल क्रमांक महावितरणकडे नोंदवले नाहीत ते ग्राहक, महावितरण मोबाईल ॲपद्वारे किंवा वरील टोल-फ्री क्रमांकावर फोन करून आपला ग्राहक क्रमांक सांगून आपल्या मोबाईल क्रमांकाची नोंद करू शकतात.

वीज देयक देय दिनांकाच्या अगोदर भरणा करणाऱ्या ग्राहकांना बिल तयार झाल्याच्या सात दिवसांत बिल भरल्यास जवळपास एक टक्के तत्पर देयक भरणा सूट मिळते. तसेच ऑनलाईन बिल भरल्यास ५०० रुपयांच्या मर्यादेत ०.२५ टक्के सूट महावितरणतर्फे देण्यात येत आहे.

महावितरणचे मोबाईल ॲप इंग्रजी व मराठी भाषेत उपलब्ध असून, अँड्रॉईड, विंडोज व आयओएस ऑपरेटिंग सिस्टिमच्या मोबाईलमध्ये डाऊनलोड होते. महावितरणच्या वेबसाईटसह विंडोज स्टोअर, गुगल प्लेस्टोअर व ॲपल ॲपस्टोअर या प्लॅटफॉर्मवरून डाऊनलोड करता येते. या ॲपमधून नवीन जोडणीची मागणी करता येते. चालू व मागील बिल पाहता येते. ते भरण्यासाठी नेटबँकिंग, क्रेडिट/डेबिट कार्ड, मोबाईल वॉलेट व कॅश कार्डचा पर्याय असून, बिल भरल्यावर पावतीचा तपशीलही मिळतो. ॲपमधून कॉल सेंटरशी संपर्क साधता येतो. ग्राहकांना एकाच खात्यातून अनेक जोडण्यांबाबतची सेवा उपलब्ध आहे. ग्राहकांना मोबाईल क्रमांक व ई-मेल नोंदवता येतो. मीटर रीडिंग न घेतलेल्या ग्राहकांना बिल तयार करण्यापूर्वी एसएमएसद्वारे लिंक पाठवण्यात येणार असून, त्यांच्या मोबाईलमधील ॲपद्वारे मीटर रीडिंग घेऊन ते महावितरणकडे पाठवण्याची सोय उपलब्ध आहे. महावितरणच्या सेवेबाबत वीजग्राहकांना फिडबॅक देण्याची सोय ॲपमध्ये आहे. बारकोडपेक्षा लोकप्रिय असलेला क्यूआर (क्विक रिस्पॉन्स) कोड नव्या वीजबिलावर उपलब्ध आहे. या कोडद्वारे वीजग्राहकांना महावितरणचे मोबाईल ॲप थेट डाऊनलोड करता येते. मोबाईलधारकांनी स्मार्टफोनमध्ये असलेल्या किंवा डाऊनलोड केलेल्या क्यूआर कोड रिडरच्या माध्यमातून महावितरणच्या वीजबिलावरील क्यूआर कोड स्कॅन केला की थेट महावितरण मोबाईल ॲपची लिंक उपलब्ध होते. त्याद्वारे महावितरण ॲप डाऊनलोड करता येते. महावितरणच्या सेवेचा जास्तीत जास्त ग्राहकांनी लाभ घ्यावा.

**- सुनील जाधव**
उपमुख्य जनसंपर्क अधिकारी, महावितरण
प्रादेशिक कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.

## पालिका वाचनालयात धोंडीराम राजपूत यांचा सत्कार



वैजापूर, दि. १५ (प्रतिनिधी) - येथील नगर पालिका वैजिनाथ वाचनालयाच्या वाचक वर्गाच्या वतीने शुक्रवार (ता.१५) रोजी सहाय्यक ग्रंथपाल गुलाबराव गायकवाड व मदतनीस संजय राजपूत यांनी नुकताच राज्य सरकारचे दोन शासकीय पुरस्कार मिळालेले धोंडीरामसिंह राजपूत याचे शाल व पुष्पहार अर्पण करून अभिनंदन केले,या प्रसंगी वाचक वर्ग मोठया संख्येने उपस्थित होते.

# सिडको एन-७ भागात अतिक्रमण निष्कशीत



छत्रपती संभाजीनगर, दि. १४ (प्रतिनिधी) - महानगरपालिका आणि सिडको कार्यालयाच्या वतीने संयुक्तरीत्या आज एन-७ येथील मेन रोड लगत असलेल्या नॅशनल सॅम्पल सर्वे ऑफिस संख्यिकी कार्यालय या शासकीय इमारतीच्या परिसरात सिडको ने सदर इमारतीमध्ये शासकीय कार्यालयासह काही खाजगी लोकांना सदर विक्री व भाड्याने दिलेले आहे.

विक्री पण केलेले आहे. त्या अनुषंगाने सदर ठिकाणी श्री घडामोड सह इतर लोकांचे अतिक्रमण होते. याबाबत सिडको कार्यालयाच्या उपलब्ध नकाशा नुसार महानगरपालिकेच्या अतिक्रमण हटवा विभागाने जानेवारी महिन्यात यांना जाहीर मोजमाप करून पंचनामा करून मार्किंगसह जास्तीचे बांधकाम बाबत कळविण्यात आले होते. त्या दृष्टीने वैभव घडामोडी यांनी खुल्या जागेवर कार्यालय परिसरातील खुल्या जागेवर पंधरा बाय पंधरा व दहा बाय दहा अशा दोन रूम बांधून वाणिज्य वापर सुरू केला होता. याशिवाय त्यांचे दुसरे बंधू यांनी प्रिटींग प्रेस च्या व्यवसाय या ठिकाणी टाकलेला आहे त्यांनी सुद्धा आपल्या मूळ जागेपेक्षा सहा सहा फूट पार्किंगच्या समोरील जागेत आरसीसी स्लॅब टाकून दुकाने काढली होती व ही दुकाने इतर लोकांना भाड्याने दिली होती. यामध्ये चहाचे दुकान पान टपरी चे दुकान अशा स्वरूपाचे अतिक्रमण होते व त्यांनी खाजगी लोकांना भाड्याने दिले होते त्यांना याबाबत अवगत करून देखील त्यांनी मनपा प्रशासन व सिडको कार्यालयास सहकार्य केले नाही काही भाग त्यांनी स्वतः काढून घेतलं परंतु मूळ अतिक्रमण खुल्या जागेवरील न काढल्याने इतर कार्यालयाला पाण्याच्या टँकर पाण्याच्या हातचा वापर करता येत नव्हता म्हणून सदर दोन्ही रूम त्यांनी सिमेंट माती विटा मध्ये वापर करून बांधकाम केले होते ते आज जेसीबीच्या साह्याने निष्काषित करण्यात आले. मागील पंधरा वर्षापासून हे अतिक्रमण होते.

आयुक्त तथा प्रशासक जी श्रीकांत यांच्या आदेशाने व अतिरिक्त आयुक्त सौरभ जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक आयुक्त झोन क्रमांक ०५ श्रीमती सविता सोनवणे, अतिक्रमण निरीक्षक सय्यद जमशेद, सिडकोचे उप अभियंता उदयराज चौधरी, सर्वेयर मिलन खिल्लारे, अतुल मोरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

## मुंबईतील ८ रेल्वे स्थानकांची परकीय नावे बदलण्याच्या शासनाच्या निर्णयाचे अभिनंदन!

**अन्य रेल्वे स्थानके, रस्ते व शहरांची परकीय नावे बदला ! - हिंदू जनजागृती समिती**

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - महाराष्ट्रातील महायुती सरकारने मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची असलेली परकीय नावे बदलून त्यांना स्वदेशी नावे देण्याच्या सुत्य निर्णय घेतला आहे. त्याचे आम्ही हिंदु जनजागृती समितीच्या वतीने हार्दिक अभिनंदन करतो ! अशाच प्रकारे परकीय आक्रमकांच्या खुणा असलेली नावे अनेक रेल्वे स्थानके, रस्ते, शहर, तालुके, गावे, उद्याने यांना देण्यात आलेली आहेत. ती परकीय नावेही वरीलप्रमाणे बदलण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने कार्यवाही करावी, अशी मागणी हिंदु जनजागृती समितीने केली आहे.

गेली अनेक वर्षे हिंदु जनजागृती समिती 'अखिल भारतीय हिंदु राष्ट्र अधिवेशन' (सध्याचे 'वैश्विक हिंदु राष्ट्र महोत्सव'), 'हिंदु राष्ट्र-जागृती सभा', 'हिंदु राष्ट्र-जागृती आंदोलने' आदी विविध माध्यमांतून परकीय तथा परकीय आक्रमकांची नावे बदलण्याची मागणी सातत्याने करत आहेत. गेल्या एक हजार वर्षांच्या काळात भारतावर मुघल, इंग्रज, पोर्तुगीज, फ्रेंच, डच आदी अनेक परकिय आक्रमकांनी साम्राज्यविस्तारार्थ आक्रमणे केली. भारतातील अनेक नगरे, वास्तू यांना दिलेली नावे बदलण्यात आली. ७५ वर्षांपूर्वी भारत हे राष्ट्र म्हणून स्वतंत्र झाले; पण पारतंत्र्याच्या या खुणा (जखमा) नगरे, वास्तू, संग्राहलये, रस्ते आदींच्या नावांमधून आजही कायम आहेत. ज्या परकीय आक्रमकांना आम्ही लढा देऊन भारतातून हाकलले आहे, त्यांची नावे भारतात का द्यावीत? ज्या आक्रमकांनी भारतियांवर अनन्वित अत्याचार केले, त्यांचे उदात्तीकरण का म्हणून करायचे? या गुलामगिरीच्या खुणा अभिमानाने मिरवणे योग्य नाही. परकीय अथवा भारतीय संस्कृतीशी मिळती जुळती नावे नसल्यामुळे समाजाच्या सांस्कृतिक जीवनविषयक संकल्पनाही बदलतात. तसेच भावी पिढीला आपल्या गौरवशाली इतिहासाची, संस्कृतीची आणि शौर्याची जाणीव होणे आवश्यक आहे. त्यामुळे स्वदेशी आणि भारतीय संस्कृतीशी मिळती-जुळती नावे देणे आवश्यक आहे.

राज्य सरकारने या आठ रेल्वे स्थानके, तसेच नगर जिल्ह्याचे नाव बदलण्याची प्रक्रिया लवकर होण्यासाठी गतीने कार्यवाही करावी. तसेच ही परकीय नावे केवळ रेल्वे स्थानकाला नसून ती स्थानिक रस्ते, उद्याने, अन्य ठिकाणांनाही देण्यात आलेली आहे. तेथेही नावेही बदलण्यात यावीत. त्याबरोबर 'चर्चगेट', 'सांताक्रुझ', 'सीवूडस्-दारावे' आदी अनेक रेल्वे स्थानकांसह दौलताबाद, औरंगपुरा, इस्लामपूर, तसेच टीपू सुलतान अशी अनेक नावे ही तालुके, गाव, शहरे, रस्ते, उद्यान, चौक आदींना दिलेली आहेत. ती सर्व नावेही बदलण्याची प्रक्रिया शासनाने करावी !

## सुंदर गणपती मित्र परिवारानी केले धोंडीराम राजपूत यांचे अभिनंदन



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - येथील सामाजिक कार्यकर्ते व जेष्ठ साहित्यिक धोंडीरामसिह राजपूत याना महाराष्ट्र शासनाने दोन पुरस्कार अनुक्रमे १) राज्यातून एकाच व्यक्तीला त्यांच्या उत्कृष्ट सामाजिक व शैक्षणिक,तसेच पर्यावरण विषयक उत्कृष्ट कार्य करण्याला दिला जातो तो म्हणजे पदमश्री, कर्मवीर दादासाहेब गायकवाड व दुसरा डॉ,बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री अजित दादा पवार समाज त कल्याण मंत्री संजय बनसोड याच्या हस्ते नुकताच मुंबई येथे एका शानदार कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. याचे औचित्य साधत येथील श्री सुनंर गणपती मंदिर मित्र परिवाराच्या वतीने शुक्रवार (ता.१४) रोजी संतोष शेठ बोथरा, काशिनाथ आगाज, अजय भुजबळ, श्रावण चौधरी, श्याम पवार व मित्र परिवारानी त्यांचे शाल, हार व पेढे भरवुन अभिनंदन केले.

## इंजि एम.बी. पाटणी, माजी विद्यार्थीतर्फे प्रितम निकुंभ या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यास सुवर्ण पदक प्रदान



छत्रपती संभाजीनगर, दि. १५ (प्रतिनिधी) - शासकीय अभियांत्रीकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील अंतिम वर्गाच्या सर्वोत्कृष्ट विद्यार्थ्यासाठी दरवर्षी सुवर्णपदक देण्यात येते. हे सुवर्णपदक पहिल्या बॅचचे ८३ वर्षीय विद्यार्थी इंजि.एम.बी. पाटणी यांच्यावतीने देण्यात येते.

यावर्षी रविवार १० मार्च २०२४ रोजी आयोजीत माजी विद्यार्थी मेळाव्यात हे सुवर्ण पदक प्रीतम निकुंभ या विद्यार्थ्याला मा. एम. बी. पाटणी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आले. सुवर्ण पदक, रू. ५१ हजार, प्रमाणपत्र, शाल असे या पुरस्काराचे स्वरूप आपल्या भाषणात मा. एम. बी. पाटणी यांनी विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी म्हणून या सुवर्ण पदकाची योजना केल्याचे स्पष्ट केले. कुठलीही अनुकुलता नसताना अडचणींवर मात करून आपण कशा पद्धतीने अभियांत्रिकी शिक्षण पूर्ण केले, कशा पद्धतीने जायकवाडी धरणाचे काम पुर्णत्वास नेले हे विषद केले, अनेक भारतीय व्यक्तींनी आपआपल्या क्षेत्रात प्रचंड कष्ट करुन उत्तुंग यश मिळविले, अशा व्यक्तींची माहिती श्री. पाटणी यांनी संकलन करुन Inspiring Sucess Stories हे पुस्तक तयार केले, ते सर्व मान्यवरांना प्रदान केले व विद्यार्थ्यांना वाचण्याकरीता आवर्जुन विनंती केली. कार्यक्रमास माजी आमदार महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी श्रीकांत जोशी, मा. जयंत देव, मा. एन. डी. देशमुख हे प्रमुख पाहुणे म्हणुन उपस्थित होते. या प्रसंगी माजी विद्यार्थी संघटनेचे सचिव डॉ. संजय शिंदे यांनी प्रास्ताविक केले, तर संघटनेची भुमिका अध्यक्ष श्रीकांत उमरीकर यांनी मांडली. प्राचार्य डॉ. डंभारे यांनी महाविद्यालयातील उपक्रमांची माहिती दिली व भविष्यातील वाटचालीसाठी सहकार्याची अपेक्षा व्यक्त केली. संस्थेचे उपाध्यक्ष डॉ. उत्तम काळवणे यांनी आभार मानले.

## आयुष्यभर देशहितासाठी प्राणपणाने झटणारे क्रांतीवीर बाबाराव सावरकर

(पान २ वरून)

पारावार राहिला नाही. धोकादायक क्रांतीकारक म्हणून तेथील तुरुंगाधिकाऱ्याने बाबारावांकडून अतिशय कष्टाची कामे करवून घेतली. तरीही बाबारावांच्या मनातील क्रांतीची भावना यत्किंचितही कमी न होता ती अधिकच धारदार झाली. संघटनचातुर्य आणि अन्यायाचा प्रतिकार हे त्यांच्या रोमरोमांत भिनले असल्यामुळे त्यांनी अंदमानातच कारावास भोगत असलेल्या स्वा. सावरकरांच्या साहाय्याने तेथील राजकीय कैद्यांना संघटित केले. चांगली वागणूक आणि अन्न मिळावे म्हणून उपोषण, असहकार, संप आदी मार्गांनी लढा दिला. परिणामी त्यांना अधिकाधिक कठोर शारीरिक शिक्षा भोगाव्या लागल्या; परंतु त्याची तमा न बाळगता बाबारावांनी आपले कार्य अविरत चालू ठेवले. अंदमानातील ११ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीत त्यांची प्रकृती पार ढासळली आणि त्यांना क्षयाचा विकार जडला. ते अंदमानात असतांनाच त्यांची पत्नी सौ. येसूवहिनींनी या जगाचा निरोप घेतला. त्या दोघांची शेवटची भेटही मुजोर शासनाने होऊ दिली नाही. १९२१ मध्ये बाबारावांना हिंदुस्थानात परत आणण्यात आले आणि साबरमतीच्या कारागृहात ठेवण्यात आले. त्या वेळी त्यांची प्रकृती खूपच खालावली होती. बाबाराव आता काही तासांचेच सोबती आहेत, असे शासनाच्या डॉक्टरने सांगितले तेव्हाच म्हणजे सप्टेंबर १९२२ मध्ये सरकारने त्यांची सुटका केली!

**बाबारावांची ग्रंथसंपदा**

बाबारावांनी अनेक पुस्तके लिहिली. 'वीर बैरागी' या भाई परमानंदलिखित पुस्तकाचे त्यांनी भाषांतर केले. या पुस्तकात बंदा वीराचे चरित्र सांगून हिंदूंना स्फूर्ती द्यावी, सूड कसा उगवावा ते शिकवावे तसेच पंजाबातील शीख आणि मराठे यांचा दुवा जोडावा, हा बाबारावांचा उद्देश होता.

या पुस्तकात औरंगजेबाच्या मुसलमानी सत्तेशी वीर बंदा बैराग्याने केलेल्या संघर्षाची कहाणी आहे. 'राष्ट्रमीमांसा' या पुस्तकात त्यांनी 'भारत हे हिंदुराष्ट्र आहे' हे सिद्ध केले आहे. 'श्री शिवरायांची आग्र्यावरील गरुडझेप' या पुस्तकात आग्र्याला जाण्यात शिवरायांचा हेतू औरंगजेबाचा वध करण्याचा होता, असे प्रतिपादन त्यांनी केले आहे. 'वीरा-रत्नमंजुषा' या पुस्तकात महाराणी पुष्पवती, राजा दाहिरच्या दोन वीरकन्या, राणी पद्मिनी, पन्नादायी आदी रजपूत स्त्रियांची चरित्रे वर्णिलेली आहेत. 'हिंदुराष्ट्र — पूर्वी, आता नि पुढे', 'धर्म हवा कशाला ?', 'ख्रिस्तास् परिचय अर्थात्ख्रिस्ताचे हिंदुत्व' ही त्यांची अन्य पुस्तके आहेत.

आयुष्यभर देशहितासाठी प्राणपणाने झटणारा हा वीरात्मा १६ मार्च १९४५ रोजी सांगली येथे कालवश झाला. बाबारावांचे चरित्र म्हणजे राष्ट्रासाठी चंदनाप्रमाणे अखंड झिजलेल्या एका थोर देशभक्ताची स्फूर्तीदायी कथा आहे !

## वीज ग्राहकांच्या सेवेसाठी ऊर्जा चॅट बॉट उपलब्ध

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - महावितरणच्या वीज ग्राहकांना तक्रार निवारण, बिल भरणा, नवीन वीज जोडणी अशा विविध कामांसाठी मदत करणाऱ्या ऊर्जा या चॅट बॉटचे उद्घाटन मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जा मंत्री देवेंद्र फडणवीस यांनी बुधवारी मुंबई येथे केले. महावितरणने आपल्या तीन कोटी ग्राहकांना गुणवत्तापूर्ण सेवा देण्यासाठी आर्टिफिशिअल इंटिलिजन्ससारख्या माहिती तंत्रज्ञानाचा पुरेपूर वापर करावा, असे मा. देवेंद्र फडणवीस यावेळी म्हणाले.

यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र, मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, महावितरणचे संचालक अरविंद भादीकर, प्रसाद रेशमे आणि योगेश गडकरी उपस्थित होते.

मा. देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ग्राहकांना भरवशाचा, दर्जेदार आणि पुरेसा वीज पुरवठा या मूलमंत्रावर महावितरणचे कामकाज सुरू आहे. ग्राहकांना दर्जेदार आणि वेळेवर सेवा देण्यासाठी ऊर्जा चॅट बॉट उपयोगी ठरेल याची मला खात्री आहे. ऊर्जा चॅट बॉटमुळे ग्राहकांना कार्यालयात येण्याची गरज राहणार नाही. दिवसाचे चोवीस तास आणि सप्ताहाचे सातही दिवस सेवा उपलब्ध असल्याने त्यांना सोईनुसार सेवेचा लाभ घेता येईल. ग्राहकांना आता महानगर क्षेत्रामध्ये तीन दिवसांत, शहरी भागात सात दिवसात आणि ग्रामीण भागात पंधरा दिवसात वीज जोडणी मिळत आहे, ही आनंदाची बाब आहे, असेही ते म्हणाले. मा. लोकेश चंद्र यांनी महावितरणच्या नव्या चॅट बॉटची माहिती देणारे सादरीकरण केले.

ऊर्जा हे चॅट बॉट महावितरणने विकसित केले आहे. कंपनीच्या वेबसाईटवर आणि ॲपवर ते उपलब्ध आहे. महावितरणशी संबंधित ग्राहकांच्या विविध समस्यांचे निराकरण करण्यासाठी या चॅट बॉटमध्ये सुविधा आहे. ग्राहकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे चॅट बॉटद्वारे दिली जातात व त्यातून ग्राहकांना मार्गदर्शन होते. ग्राहकांना त्वरित प्रतिसाद तसेच जलद आणि कार्यक्षम सुविधा प्रदान करणे ही या चॅट बॉटची वैशिष्ट्ये आहेत

## एआयमुळे जगावर 'वीजसंकट'; तासाला वापरली जातेय १७ हजार पट अधिक उर्जा

वॉशिंग्टन, दि. १५ (वृत्तसंस्था) - आर्टिफिशियल इंटेलिजन्स म्हणजेच एआयमुळे (Artificial Intelligence) एकीकडे लोकांची बरीच कामे सोपी झाली आहेत. मात्र, हळू-हळू एआयचे अनेक धोके देखील समोर येत आहेत. एकीकडे एआयमुळे नोकऱ्या जाण्याची भीती व्यक्त केली जात असतानाच आता याच एआयमुळे जगावर मोठे वीज संकटही येऊ शकते, असा एका रिपोर्टमध्ये धोक्याचा इशारा देण्यात आला आहे.

दि न्यूयॉर्करने दिलेल्या एका रिपोर्टनुसार, ओपनएआय कंपनीचा चॅटजीपीटी हा चॅटबॉट एका तासाला तब्बल ५ लाख किलोवॅट वीज खर्च करतो. सध्या जगभरात कित्येक मोठ्या कंपन्यांनी आपले आपले एआय चॅटबॉट लाँच केले आहेत. एकट्या चॅटजीपीटीची आकडेवारी एवढी असेल, तर सगळ्यांची मिळून किती वीज खर्च होत असेल, हा विचारच हादरवून टाकणारा आहे.

रिपोर्टमध्ये दिलेल्या माहितीनुसार, अमेरिकेतील घरांमध्ये मिळून जेवढी वीज वापरली जाते, त्या तुलनेत तब्बल १७,००० पट अधिक वीज चॅटजीपीटी दररोज वापरते. चॅटजीपीटीच्या केवळ २० कोटी यूजर्ससाठी हा खर्च होतो. भविष्यात चॅटजीपीटीचा विस्तार झाला, त्याचे यूजर्स वाढले की पर्यायाने त्यासाठी होणारा विजेचा वापरही अधिक होणार आहे.

बिझनेस इन्सायडरला दिलेल्या मुलाखतीत डेटा सायंटिस्ट ॲलेक्स डी. व्रीज यांनी सांगितले, की गुगल सध्या प्रत्येक सर्च रिझल्टमध्ये जनरेटिव्ह एआय वापरत आहे. एआयमुळे वर्षाला सुमारे २९ बिलियन किलोवॅट प्रतितास एवढी वीज वापरली जाते. केनिया, क्रोएशिया अशा छोट्या देशांना संपूर्ण वर्षभरासाठी देखील ही वीज पुरून उरते, असे त्यांनी स्पष्ट केले. एआयचा वापर जेवढ्या प्रमाणात वाढणार आहे, तेवढा त्यासाठी लागणाऱ्या विजेचा वापरही वाढणार आहे. एआयचे यूजर्स सध्या तुलनेने अगदीच कमी आहेत. मात्र, भविष्यात जेव्हा सगळ्या क्षेत्रांमध्ये एआय पसरेल आणि यूजर्स वाढतील तेव्हा त्यासाठी होणाऱ्या वीजेचा वापरही भरमसाठ वाढणार आहे. यामुळे आतापासूनच एआय कंपन्यांनी सोलर किंवा अन्य हरित उर्जेचा वापर करावा, असे आवाहन तज्ज्ञांनी केले आहे.

# प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत पाच हजार लाभार्थ्यांना मंजुरी

मुंबई, दि. १५ (प्रतिनिधी) - सौर ऊर्जा निर्मितीचा वापर करून तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या ग्राहकांना मोफत वीज मिळवून देण्यासाठीच्या प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत राज्यातील पाच हजार वीज ग्राहकांना एकाच वेळी मंजुरीचे संदेश मा. उपमुख्यमंत्री तथा ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते बुधवारी पाठविण्यात आले.

मा. पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांनी तीनशे युनिटपर्यंत वीज वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांना मोफत वीज मिळावी आणि अतिरिक्त वीज विकून उत्पन्नही मिळावे यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजना दि. १३ फेब्रुवारी २०२४ रोजी सुरू केली आहे. या योजनेचा आज राज्यात उपमुख्यमंत्री महोदय यांच्या शुभ हस्ते शुभारंभ करण्यात आला.

यावेळी अपर मुख्य सचिव (ऊर्जा) श्रीमती आभा शुक्ला, महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र, मा. उपमुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव श्रीकर परदेशी, महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक, महावितरणचे संचालक अरविंद भादीकर, प्रसाद रेशमे आणि योगेश गडकरी उपस्थित होते. मा. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले की, ज्या लाभार्थ्यांना आज मंजुरी आदेश मिळत आहेत, त्या सर्वांना शुभेच्छा. महावितरणतर्फे मोहीम स्वरुपात ही योजना राबविण्यात यावी. जास्तीत जास्त ग्राहकांना योजनेचा लाभ होण्यासाठी योजनेबद्दल जनजागृती करावी. महावितरणचे अध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक मा. लोकेश चंद्र यांनी योजनेची माहिती दिली. प्रधानमंत्री सूर्यघर मोफत वीज योजनेत केंद्र सरकारकडून छतावरील सौर ऊर्जा निर्मितीचे रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविणाऱ्या वीज ग्राहकांना ७८ हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाते. एक किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला तीस हजार रुपये, दोन किलोवॅट क्षमतेच्या प्रकल्पाला साठ हजार रुपये व तीन किलोवॅट किंवा त्यापेक्षा अधिक क्षमतेच्या प्रकल्पाला ७८ हजार रुपये अनुदान मिळते. छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्पात निर्माण झालेली वीज घरामध्ये वापरायची, प्रकल्पात गरजेपेक्षा अधिक वीज निर्माण झाल्यामुळे वीजबिल शून्य येते तसेच अतिरिक्त वीज महावितरणला विकता येते, अशी ही योजना आहे.

या योजनेत नोंदणी करण्यासाठी पीएम — सूर्यघर हे अत्याधुनिक मोबाईल ॲप ग्राहकांना उपलब्ध करण्यात आले आहे. त्यावर नोंदणी केल्यानंतर छतावरील सौर ऊर्जा निर्मिती प्रकल्प बसविण्यासाठी ग्राहकांना आपल्या पसंतीनुसार विक्रेता निवडता येतो. छतावर सौर ऊर्जा प्रकल्प बसविल्यानंतर अनुदान थेट ग्राहकांच्या खात्यात जमा केले जाते. छतावरील सौर ऊर्जा निर्मिती करणाऱ्या रूफ टॉप सोलर प्रकल्पांसाठी महावितरण राज्यातील ग्राहकांना मदत करते. महावितरणच्या पुढाकाराने यापूर्वी राज्यात १,३८,००० ग्राहकांनी रूफ टॉप सोलर प्रकल्प बसविले असून त्यांची एकूण क्षमता १९०० मेगावॅट आहे. यामध्ये एक लाख घरगुती ग्राहकांचा समावेश आहे.

सोमवार खेरीज दररोज प्रसिद्ध होणारे दैनिक
लोकविजय
(आरएनआय रजि. नं. ११४२१/६१)
हे पत्रक मुद्रक, प्रकाशक श्री. राजेंद्र पांडुरंग रांजणीकर यांनी सोलापूर तरूणभारत मिडिया लिमिटेड, रेल्वेस्टेशन एमआयडीसी स्टेशनरोड औरंगाबाद येथे छापून दैनिक लोकविजय कार्यालय, ३, चेतनानगर, (माणिक आर्केडच्या पाठीमागे,) औरंगाबाद येथे प्रसिद्ध केले.
: संपादक :
राजेंद्र पांडुरंग रांजणीकर
मो. :९३२५२११९०१, ९५१८७६६३९५
e-mail:lokvijay2000@yahoo.co.in
या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या, फीचर, लेख, कथा यांच्या मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.
बातम्या व इतर मजकूराबद्दल काही वाद निर्माण झाल्यास त्याची सर्व जबाबदारी संबंधीत वार्ताहार, प्रतिनिधी, उपसंपादक, वृत्तसंपादक, यांची राहील. संपादक, मालक, प्रकाशक, मुद्रक त्याला जबाबदार राहणार नाहीत.
(औरंगाबाद न्यायकक्षेत)

# दोन दिवसांत राजकारणात भूकंप होणार!

## आमदार संजय शिरसाट यांचे सूचक विधान

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- भाजपने महाराष्ट्रातील २० उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. तर महायुतीतील मित्र पक्षांनी अद्याप उमेदवारांची नावे जाहीर केलेली नाही. त्यामुळे महायुतीतील जागा वाटपाचा तिढा हा अजूनही कायम आहे. तर रविवार किंवा सोमवारी शिंदे गटाची यादी जाहीर होण्याची शक्यता आहे. याच पार्श्वभूमीवर शिवसेनेचे प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मोठे भाकित केले आहे.

शिंदे गटाच्या उमेदवारांची नावे ही सोमवारपर्यंत जाहीर करण्यात येणार असल्याचे संजय शिरसाठ यांनी सांगितले. तसेच राजकीय घडामोडींवर बोलत असतांना शिरसाट म्हणाले की, येत्या दोन दिवसांत राजकारणात मोठ्या घडामोडी घडू शकतात, असे संकेत त्यांनी दिले. शिरसाट यावेळी पत्रकार परिषदेत बोलत होते.

शरद पवारांनी महादेव जानकर यांना रासपला लोकसभेची एक जागा देणार असल्याचे आश्वासन दिल्याची माहिती जानकरांनी दिली होती. यावर शिरसाठ म्हणाले की, अनेकजण आता शरद पवारांच्या भेटीला जातील. तसेच जानकरही त्यांच्या भेटीला जातील. त्यासाठी त्यांना आमच्या शुभेच्छा आहेत. मात्र, येत्या दोन दिवसांत आमच्या शिंदे गटाकडे येणाऱ्यांची संख्या पाहिली तर अनेकांना आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही. येत्या सोमवारी मोठे भूकंप पाहायला मिळणार असल्याचे भाकितही त्यांनी यावेळी केले.

एआयएमआयएम महाराष्ट्रात लोकसभेच्या सहा जागा लढवण्याची शक्यता आहे. याबाबत छत्रपती संभाजीनगरचे खासदार इम्तियाज जलील यांनी तसे संकेतदेखील दिले आहेत. याबरोबरच खासदार इम्तियाज जलील यांनी त्यांचा प्रचार देखील सुरू केला असून २०२४ ची लोकसभा निवडणूक जिंकणार असा दावा ते करत आहेत. यावर शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट म्हणाले, प्रत्येक उमेदवार आपल्या शैलीत प्रचार करत असतो. पण यावेळी छत्रपती संभाजीनगरमध्ये एआयएमआयएम नावालादेखील उरणार नाही, एवढे निश्चित आहे.

लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडीची युती होणार असल्याची चर्चा सरू आहे. या संदर्भात वंचित बहुजन आघाडी आणि महाविकास आघाडीच्या नेत्यांमध्ये बैठकादेखील पार पडत आहेत. तर महाविकास आघाडीने वंचितसाठी चार जागा देण्याचे मान्य केले. याबाबत शिवसेना प्रवक्ते संजय शिरसाट यांनी मोठे विधान केले. ते म्हणाले, आज महाविकास आघाडीची बैठक होत आहे. मात्र, या बैठकीला ॲड. प्रकाश आंबेडकर यांना बोलावले नाही, म्हणजे महाविकास आघाडीला वंचित बहुजन आघाडीसोबत युती करायची नाही, हे स्पष्ट होत आहे. या आघाडीची सुरूवातच बिघाडीची आहे, असे संजय शिरसाट म्हणाले.

## धोंडीरामसिंह राजपूत व डॉ.संतोष गंगवाल यांचा पालिकेच्या वतीने नागरी सत्कार



वैजापूर दि.१५ (प्रतिनिधी)- महाराष्ट्र शासनाने सामाजिक कार्यकर्ते धोंडीरामसिंह राजपूत यांना पदमश्री कर्मवीर दादासाहेब गायकवाड हा पुरस्कार राज्यातील एकाच व्यक्तीला दिला जाणारा पूरस्कार दिला व दुसरा डॉ,बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार देवून त्यांच्या अष्टपैलू कार्याची दखल घेतली.

त्याबद्दल तसेच येथील डॉ. संतोष गंगवाल याना डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार दिल्या बद्धल येथील नगरपालिकेचे मुख्याधिकारी तथा प्रशासक भागवत बिघोत (राजपूत) यांनी विशेष ठराव घेऊन यांचा शुक्रवार (ता.१५) रोजी सपत्नीक सत्कार करुन त्यांचे अभिनंदन केले.

माजी नगराध्यक्ष डॉ.दिनेश परदेशी, साबेरखान, पोलीस निरीक्षक श्यामसुंदर कौठाळे, आ.रमेश पा.बोरनारे यांचे बंधू संजय बोरनारे, राजपूत समाजाचे जेष्ठ नागरिक गंगारामसिंह राजपूत नगरसेवक गणेश खैरे, गौरव दौडे, सोनू राजपूत, अशोक आप्पा पवार, नगर अभियंता प्रकाश पाटील, जयपालसिंह राजपूत, व्ही. डी.राजपूत, डॉ.सचिन राजपूत, पल्लवी राजपूत, गायत्री राजपूत, शंकर जोरे पाटील, वाल्मिक शेटे, मिलिंद साळवे, पोलीस अधिकारी श्री मेटे, यांच्या सह पालिकेचे कर्मचारी ,अधिकारी, व नागरिक उपस्थित होते.

## डॉ.संतोष गंगवाल यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार



वैजापूर दि.१५ (प्रतिनिधी)- येथील सामाजिक कार्यकर्ते व कोरोना काळात कोरोना रुग्णांसाठी अहोरात्र झटणारे डॉ.संतोष गंगवाल यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ,बाबासाहेब आंबेडकर समाज भूषण पुरस्कार मंगळवार (ता.१२)रोजी समाज कल्याण विभागाचे सचिव सुमंत भांगे यांनी मुंबई येथे ऐका भव्य कार्यक्रमात प्रदान करून त्यांचा यथोचित सन्मान केला, त्यांच्या समवेत त्यांच्या पत्नी सौ, गंगवाल यानाही गौरविण्यात आले,स्मृती चिन्ह,सन्मान पत्र व रोख रक्कम असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. डा. गंगवाल येथील चिंतामणी पतसंस्थाचे सचिव आहेत. तसेच स्व.लालाबिंदाप्रसाद श्रीवास्तव या विद्यार्थी वस्ती गृहाचे सचिव म्हणून कार्यरत आहेत,ते गत २५ वर्ष पासून सामाजिक सेवा करीत आहेत या समयी समाज कल्याण विभागाचे वरिष्ट अधिकारी उपस्थित होते,त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्धल सर्वत्र त्यांचे अभिनंदन होत आहे.

## डॉ.सुनीता सावरकरांच्या 'ढोर चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणिवांचा परिघ' या पुस्तकावर सोमवारी परिसंवाद

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि मराठवाडा विद्यापीठाच्या इतिहास विभागातील सहा. प्राध्यापक डॉ.सुनीता सावरकर यांच्या 'ढोर-चांभार स्त्रियांच्या आंबेडकरी जाणीवांचा परिघ' या साडेतीन महिन्यातच दुसरी आवृत्ती प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर, सोमवारी मुंबईत परिसंवाद होणार आहे.

दस्तूरखुद्द डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी स्थापन केलेल्या दि पीपल्स इम्प्रुमेंट ट्रस्ट, मुंबई आणि ग्रंथाली यांच्या संयुक्त विद्यमाने हा परिसंवाद आयोजित करण्यात आलेला आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ट्रस्टचे सचिव आणि भारतीय बौद्ध महासभेचे कार्याध्यक्ष डॉ भीमराव यशवंतराव आंबेडकर राहणार असून ज्येष्ठ साहित्यिक आणि आंबेडकरी विचारवंत अर्जुन डांगळे, उर्मिला पवार, आ. लहू कानडे, राम दोतोंडे आणि ग्रंथालीचे प्रमुख विश्वस्त सुदेश हिंगलासपूरकर सहभागी होणार आहेत.

सोमवार दि. १८ मार्चला मुंबईत डॉ.बाबासाहेब आंबेडकर भवन, दादर येथे हा कार्यक्रम संपन्न होईल.

## मनाई आदेश जारी

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था अबाधित रहावी यासाठी अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी कलम ३७(१) व ३७(२) अन्वये दि.३१ मार्च पर्यंत मनाई आदेश जारी केले आहेत. त्याअन्वये सार्वजनिक ठिकाणी शस्त्र बाळगणे, दाहक स्फोटक पदार्थ बाळगणे, पाच किंवा अधिक व्यक्तिंना सार्वजनिक ठिकाणी एकत्र जमणे, निदर्शने करण्यास मनाई करण्यात आली आहे. यासंदर्भात पूर्वपरवानगी देण्याचे अधिकार पोलीस अधीक्षक ग्रामिण यांनी प्राधिकृत केलेल्या पोलीस अधिकाऱ्यांना राहतील,असेही अपर जिल्हादंडाधिकारी विनोद खिरोळकर यांनी स्पष्ट केले आहे.

## अनुसूचित जाती, इमाव, सफाई कर्मचाऱ्यांच्या अर्थसहाय्यासाठी पोर्टल

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- भारत सरकारच्या सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालयाच्या अधिपत्याखालील राष्ट्रीय मागासवर्गीय वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय अनुसूचित जाती वित्त व विकास महामंडळ, राष्ट्रीय सफाई कर्मचारी वित्त व विकास महामंडळ या तीन राष्ट्रीय महामंडळांतर्फे सर्व राज्यातील अनुसूचित जाती, इतर मागासवर्ग व सफाई कर्मचाऱ्यांच्या अर्थसहाय्यासाठी सुरज हे राष्ट्रीय पोर्टल अनावरण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दुरदृष्य प्रणालीद्वारे करण्यात आले. हा कार्यक्रम जिल्हा नियोजन समिती सभागृहात बुधवारी (दि.१३) पार पडला. सेफ्टी टॅंक कामगारांसाठी आयुष्मान हेल्थकार्डचे वाटप करण्यात आले. सामाजिक न्याय विभागाचे सहा. आयुक्त पांडुरंग वाबळे, मनपा उपायुक्त जाधव. महात्मा फुले आर्थिक विकास महामंडळाचे शेख, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे महामंडळाचे पवार, मनपा आरोग्य अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. उपस्थितांना संत रोहिदास चर्मोद्योग व चर्मकार महामंडळाची माहिती देण्यात आली. जिल्हा व्यवस्थापक संगिता पराते यांनी ही माहिती दिली. महिला स्मृद्धी, लघु ऋण वित्त योजनांचे मंजूरीपत्रही यावेळी लाभार्थ्यांना देण्यात आले,असे संगिता पराते जिल्हा व्यवस्थापक, जिल्हा कार्यालय, लिडकॉम यांनी कळविले आहे.

## मला लोकसभेत संधी मिळेल, संजय राऊतांच्या भेटीनंतर वसंत मोरेंचे विधान

पुणे दि.१५ (प्रतिनिधी)- मला लोकसभेत पुण्यात संधी मिळेल, पुण्याच्या स्थानिक नेत्यांशी मी चर्चा करेन, असे वसंत मोरे म्हणाले. तसेच पुण्यामध्ये वॉशिंग मशिन नकोच, माझंही मत तेच आहे असे मोठं विधानही त्यांनी केले आहे. वसंत मोरे यांनी आज ठाकरे गटाचे संजय राऊत यांची भेट घेतली. जवळपास अर्धातास या दोन्ही नेत्यांमध्ये चर्चा झाली. यानंतर ते बोलत होते.

यावेळी मोरे म्हणाले, मी सध्या फक्त महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या भेटीगाठी घेत आहे. पण या सगळ्या भेटीगाठी मी उघडपणे घेत आहे. बंद दरवाजे ठेवून मी कोणत्याही भेटीगाठी घेत नाही आहे. मला पुण्याची लोकसभा निवडणूक लढवायची आहे, यावर मी ठाम आहे यासाठी मी महाविकास आघाडीतील नेत्यांची भेट घेत आहे. संजय राऊत, शरद पवार यांच्या भेटी मी घेतल्या ते सुद्धा सकारात्मक आहेत, असे मोरे म्हणाले.

याशिवाय पुण्याची जागा काँग्रेसकडे जरी असली तरी त्या ठिकाणची नेत्यांशी माझा समन्वय आहे त्यांच्या मी संपर्कात आहे. आमदार रविंद्र धंगेकरांशी मी फोन केला आहे. त्यांना अजून फोन करणार देखील आहे. ते देखील माझ्या भूमिकेला साथ देतील, असा विश्वास वसंत मोरेंनी व्यक्त केला आहे. सोबतच काँग्रेसचे अरविंद शिंदे देखील इच्छूक आहेत. त्यामुळे त्यांच्याशी देखील चर्चा करणार असल्याचं ते म्हणाले.

## ईव्हीएमवरील विश्वासाला सर्वोच्च न्यायालयाचा प्रतिसाद; दोन याचिका फेटाळल्या

नवी दिल्ली दि.१५ (वृत्तसंस्था)- सर्वोच्च न्यायालयाने ईव्हीएमवरील विश्वासाला पुन्हा प्रतिसाद देत, आज १९ लाखांहून अधिक ईव्हीएम गहाळ झाल्याची शंका आणि निवडणुका घेण्यासाठी बॅलेट पेपरचा वापर करण्याबाबत अशा दोन रिट याचिका फेटाळून लावल्या. १९ लाख गहाळ ईव्हीएम याचिकेप्रकरणी निर्णय देताना, न्यायालयाने अशा शंका आणि आरोप पूर्णपणे निराधार असल्याचे म्हटले आहे व हे प्रकरण भारत निवडणूक आयोगाच्या बाजूने निकाली काढले आहे. याचिकाकर्ता-आयएनसीपीने अशी भीती व्यक्त केली की, २०१६-१९ दरम्यान भारत निवडणूक आयोगाच्या कोठडीतून गहाळ झालेल्या १९ लाख ईव्हीएमचा वापर आगामी लोकसभा सार्वत्रिक निवडणूक, २०२४ मध्ये फेरफार करण्यासाठी केला गेला असता.

लोकप्रतिनिधी कायदा, १९५१ चे कलम ६१ए बाजूला सारुन बॅलेट पेपर वापरून निवडणुका घेण्यासंदर्भातील आणखी एका याचिकेवर सुनावणी करण्यास नकार देताना न्यायमूर्ती खन्ना यांनी निरीक्षण नोंदविले की ईव्हीएमच्या कामकाजाशी संबंधित विविध मुद्यांवर १० हून अधिक प्रकरणे तपासण्यात आली आहेत. न्यायालयाने वेळोवेळी याचिका फेटाळताना ईव्हीएमच्या कार्यपद्धतीवर नेहमीच विश्वास दर्शविला आहे.

गेल्या दशकात आणि सुमारे ४० निकालांमध्ये, सर्वोच्च न्यायालयाने भारत निवडणूक आयोग ईव्हीएम आणि या संबंधांतील पारदर्शक प्रक्रिया आणि कठोर प्रशासकीय कार्यप्रणालीवर त्यांची श्रध्दा आणि विश्वास कायम ठेवला आहे, त्यामुळे भारतात ईव्हीएमच्या बाजूने मिळत असलेल्या न्यायाला प्रचंड मूल्य आणि सामर्थ्य मिळाले आहे.

सर्वोच्च न्यायालयाचे नवीनतम निर्णय, सर्वोच्च न्यायालय आणि उच्च न्यायालयांच्या आदेशांच्या मजबूत आणि वाढत्या प्रतिमेमध्ये आणखीच भर घालतात, ज्यांनी विविध ईव्हीएम प्रकरणांची तपासणी केली आहे आणि भारत निवडणूक आयोगाच्या बाजूने निर्णय दिला आहे. तसेच हेही लक्षात घ्यावे की अलीकडील एका प्रकरणात (मध्य प्रदेश जन विकास पक्ष विरुद्ध भारतीय निवडणूक आयोग, विशेष रजा याचिका (सिव्हिल) १६८७०/२०२२, सप्टेंबर, २०२२), माननीय सर्वोच्च न्यायालयाने अर्जदारास ५०,००० रुपये एवढा दंड ठोठावला आहे. याचिकाकर्त्याने असे निरीक्षण नोंदवले की, देशात अनेक दशकांपासून ईव्हीएमचा वापर केला जात आहे, परंतु वेळोवेळी उपस्थित केलेले मुद्दे खोडण्यात आले आहेत. दिल्ली उच्च न्यायालयाने देखील अशाच एका याचिकेवर (सी. आर. जया सुकीन विरुद्ध भारतीय निवडणूक आयोग आणि इतर, रिट याचिका (सिव्हिल) ६६३५/२०२१, ऑगस्ट २०२१) रु.१०,००० चा दंड ठोठावला होता. ज्यामध्ये ईव्हीएमचा वापर थांबवण्यास सांगून आगामी सर्व निवडणुकांमध्ये ईव्हीएम आणि त्याऐवजी बॅलेट पेपर वापरण्याचे अर्जदाराने नमूद केले होते.

तत्पूर्वी, दिल्लीच्या उच्च न्यायालयाने, दिल्ली प्रदेश काँग्रेस कमिटीने आगामी लोकसभा निवडणुकीत वापरल्या जाणाऱ्या इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि व्हीव्हीपॅटसाठी सुरू असलेली प्रथमस्तरीय तपासणी (एफएलसी) प्रक्रिया संपुष्टात आणण्याची विनंती करणारी याचिका फेटाळून लावली होती. एनसीआर न्यायालयाने, आपल्या निकालात, विद्यमान कार्यपद्धतीच्या मजबूती आणि पारदर्शकतेवर जोर दिला आणि याचिकाकर्त्यांचे दावे खोडून काढले.

ईव्हीएम मॅन्युअल, स्टेटस पेपर, ईव्हीएम प्रेझेंटेशन, ईव्हीएमच्या ४० वर्षांच्या प्रवासावरील प्रगतीपुस्तक, ईव्हीएमचा कायदेशीर इतिहास यासारख्या प्रकाशनांच्या स्वरूपात ईव्हीएमशी संबंधित प्रक्रिया आणि सुरक्षा उपायांची माहिती सार्वजनिक माध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आणि सतत अद्ययावत केलेले ईव्हीएम प्रश्नावलीबाबत भारत निवडणूक आयोग नेहमीच आघाडीवर आहे.

## पंक्चर दुचाकी ढकलण्याचा बहाना करत महिलेच्या पर्समधील मोबाईल लंपास

छत्रपती संभाजीनगर दि.१५ (प्रतिनिधी)- सकाळी लवकर कंपनीच्या ऑफीसला जाणाऱ्या एका महिलेची दुचाकी वाटेत पंक्चर झाली. ती महिला दुचाकी ढकलत नेतांना पाहुन एक चोरटा मदत करण्याच्या उद्देशाने जवळ येत मी तुम्हाला मदत करतो, असे सांगून त्याने दुचाकी ढकलत पंक्चर दुकानाकडे नेत असतांना दुचाकीच्या हॅण्डलला असलेल्या पर्समधील दोन मोबाईल हातोहात लंपास केले. गुरूवारी १४ मार्चला सकाळी ९.३० च्या सुमारास महावीर चौक ते फॅमिली कोर्ट या परिसरात हा प्रकार घडला.

श्वेता सुदर्शन कुलथे २८ रा. विश्रांतीनगर एन-४ या एका कंपनीत जॉब करतात. सकाळी नेहमीप्रमाणे त्या दुचाकीवर जात होत्या. महावीर चौक परिसरात त्यांची दुचाकी पंक्चर झाल्याने श्वेता दुचाकी ढकलत असतांना २० ते २५ वयोगटातील तरूण आला. मदत करण्याच्या बहाण्याने त्याने मोबाइल लंपास केले. याप्रकरणी श्वेता कुलथे यांच्या तक्रारीवरून क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला असून पुढील तपास सहाय्यक फौजदार रमेश कंदे करत आहेत.

(पान १ वरुन)

### लोकसभा निवडणूकीची आज घोषणा

निवडणूक आयोग सुखबीर संधू आणि ज्ञानेश कुमार यांनी शुक्रवारीच लोकसभा निवडणुकीसंदर्भात बैठक घेतली. एका दिवसापूर्वी दोन निवडणूक आयुक्तांची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्ञानेश कुमार आणि सुखबीर संधू हे नवीन निवडणूक आयुक्त आहेत ज्यांनी शुक्रवार, १५ मार्च रोजी पदभार स्वीकारला. आयोगाच्या तिन्ही अधिकाऱ्यांनी शुक्रवारीच निवडणूक कार्यक्रमासंदर्भात बैठक आयोजित केली होती.

गेल्या वेळी २०१९ मध्ये सार्वत्रिक निवडणुकांची तारीख १० मार्च रोजी जाहीर करण्यात आली होती. गेल्या वेळी ११ एप्रिल ते १९ मे दरम्यान टप्प्याटप्प्याने लोकसभा निवडणुका झाल्या होत्या. गेल्या वेळी ६७.१ टक्के मतदान झाले होते. तर २३ मे रोजी मतमोजणी झाली. यावेळी लोकसभा निवडणुकीत सुमारे ९७ कोटी लोक मतदान करणार आहेत. यावेळी निवडणुकीत भ्रष्टाचार रोखण्यासाठी अनेक नवी पावले उचलली जातील, असा दावा आयोगाने केला आहे.

### अमेरिकेने सीएएवर केलेल्या....

अमेरिकेच्या वतीने गुरुवारी सीएए वर भाष्य करण्यात आले होते. भारताने नागरिकत्व दुरुस्ती कायद्याची अधिसूनचा काढल्याबद्दल आम्हाला चिंता वाटते. भविष्यात या कायद्याच्या अंमलबजावणीवर आमचे बारीक लक्ष असेल, अशी टिप्पणी अमेरिकेने केली होती. त्यावर उत्तर देण्यासाठी परराष्ट्र मंत्रालयातर्फे पत्रकार परिषद घेण्यात आली. परराष्ट्र खात्याचे प्रवक्ते रणधीर जैस्वाल यांनी म्हटले की, नागरिकत्व दुरुस्ती कायदा हा संपूर्णपणे भारतातील अंतर्गत बाब आहे. भारताची सर्वसमावेशकता आणि मानवी अधिकाराशी संबंधित दीर्घकालीन धोरणाचा सीएए एक भाग आहे.

प्रवक्ते रणधीर जैस्वाल म्हणाले की, अफगाणिस्तान, पाकिस्तान आणि बांगलादेशमधील हिंदू, शीख, बौद्ध, पारशी आणि ख्रिश्चन समुदायातील छळ झालेल्या अल्पसंख्याकांना या कायद्यामुळे आश्रय मिळणार आहे. हा कायदा नागरिकत्व देण्यासाठी तयार करण्यात आलेला आहे, कुणाचेही नागरिकत्व काढून घेण्यासाठी नाही असे म्हटले.

### सरकारची ईडी सीबीआयच्या...

यांनी केला. एक ते दोन दिवसांमध्ये दूध का दूध आणि पाणी का पाणी होऊन जाईल, असा इशाराही त्यांनी दिला. सरकारी ईडी, सीबीआयच्या माध्यमातून लोकांना धमक्या देत त्यांच्याकडून वसुली करत असल्याचा आरोपही त्यांनी केला.

काँग्रेसच्या खात्यावर आलेल्या बंधनांवरून जयराम रमेश यांनी भाजपवर टीका केली. भाजपकडून काँग्रेसवर सर्जिकल स्ट्राईक करण्यात आल्याचे म्हणाले. काँग्रेसचे स्वतःचे बँक खाते ऑपरेट करू शकत नाही, काँग्रेसला जाणून बुजून आर्थिक स्वरूपात अपंग करण्यात येत आहे. मात्र, याला आम्ही घाबरून जाणार नाही, या विरोधात पुढे सुप्रीम कोर्टात जाणार असल्याचे ते म्हणाले.

### शिंदे गटात गेलेले १२ आमदार...

यामुळे आता काही नेते उद्धव ठाकरे यांच्या संपर्कात असल्याचे सांगितले जात आहे.

असीम सरोदे म्हणाले की, श्रीनिवास वनगा पालघर, लता सोनवणे चोपडा, महेद्र दळवी, प्रकाश सुर्वे, बालाजी कल्याणकर, चिमणराव पाटील, नितीनकुमार तळे, प्रदीप जैस्वाल, महेश शिंदे, प्रकाश आबिटकर या आमदारांच्या नावांचा समावेश आहे. या आमदारांना लक्षत आले आहे की या माणसासोबत आपले भविष्य नाही, असे त्यांनी म्हटले आहे. तर ज्यांना ठाणे जिल्ह्याच्या बाहेर ओळख नाही, असा टोलाही सरोदे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना लगावला आहे. मात्र, उद्धव ठाकरेंनी यांना परत पक्षात घेतले नाही पाहिजे असेही त्यांनी म्हटले आहे.


**छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका**

(मालमत्ता व्यवस्थापन विभाग)

जा.क्र./मनपा/मामअ/१७१९/२०२४ दिनांक :- १५/०३/२०२४

**जाहिर प्रगटन**

छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकेचे हडको, एन-११, मयुरनगर-सुदर्शन नगर येथील खुल्या जागेत सद्यास्थितीत कमी अधिक संख्येने भाजी विक्रेते विना परवानगी अनाधिकृतरित्या भाजी विक्रीचा व्यवसाय करीत आहेत.

त्यामुळे नागरिकांच्या सुविधे करीता व भाजी विक्रेत्यांच्या सोईसाठी छत्रपती संभाजीनगर महानगरपालिकने एन-११, हडको येथील खुल्या जागेचे नियोजन करुन या ठिकाणी भाजी विक्रेत्यांसाठी १०८ ओटे व फळ विक्रेत्यांसाठी ३२ ओटे, प्रत्येकी २×२ मी. आकाराचे असे एकुण १४० ओटे बांधणे, ओटयांवर काऊंटर, दोन ओटयांमध्ये विभाजन भिंत अंतर्गत रस्ते व संपुर्ण भाजी मंडईवर शेड असे बांधकाम करण्यात येणार आहे.

तरी ज्या भाजी विक्रेत्यांना स्वारस्य आहे, त्यांनी महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामध्ये दि. ३०.०३.२०२४ रोजी सायंकाळी ०५.०० वाजेपर्यंत आपला विहीत नमुना अर्ज भरुन अनामत रक्कमेच्या पावतीच्या मुळ प्रतीसह सादर करावा. ओटा / गाळेधारक यांची निवड प्रथम अर्ज, प्रथम निवड व पुर्वी या ठिकाणी व्यवसाय करीत असल्याचा कालावधी या तत्वावर करण्यात येईल. या दिनांकानंतर प्राप्त होणारे स्वारस्य अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

सदरील ओट्यांकरीता स्वारस्य असलेल्या भाजी विक्रेत्यांनी प्रत्येक ओट्यांकरिता बिनव्याजी अनामत रक्कम रु.१.२५ लाख महानगरपालिकेच्या लेखा विभागात भरणा करुन आपल्या अर्जासह पावती महानगरपालिकेच्या मालमत्ता विभागामध्ये सादर करावयाची आहे.

भाजी विक्रीसाठीचा ओटा वितरीत केल्यानंतर गाळा / ओटा ताब्यात देणेपुर्वी ओटेधारकांकडून अनामत रक्कमे व्यतिरिक्त सुरुवातीस पहिल्या सहा महिन्यांकरीता प्रती दिन रु.५०/- या प्रमाणे भाडे आगाऊ स्वरुपात भरणा करणे आवश्यक राहील.

स्वाक्षरीत/-
आयुक्त तथा प्रशासक
छत्रपती संभाजीनगर महानगरपालिका